

# श्रीसाईलीला




स्थापना १९१६
साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे
सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी
ई. आर. मालपेकर
टे. नं.
जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २
२९६३१



# श्री सा ई वा क्सु धा

ज्यांना आपण गुरु मानिलें त्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवावा. तोच जीवनांत सर्वस्व वाटावा. त्याच्यापेक्षां श्रेष्ठ या जगांत दुसरें कांहीं असूं नये. 'तूं मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मीही।' हेंच माझ्या गुरुनें मला शिकविलें. गुरु हाच कर्ता हर्ता अशी पूर्ण श्रद्धा असावी. त्या श्रद्धेचें फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. मग शास्त्र पठण करायला नको. कोणतीही साधना करायला नको. सद्गुरुवर संपूर्ण निष्ठा हेंच एकमेव पथ्य पाळावयाचें; कारण तिन्हीं जगांत गुरु हाच सर्व श्रेष्ठ आहे.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] नोव्हेंबर १९६५ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

निष्ठापूर्वक ध्यान करणें हेंच या जगांत श्रेष्ठ आहे. ध्यान म्हणजे भक्ति. त्या भक्तिभावांत एकनिष्ठपणा हवा. ध्यान करतां करतां एकरूपता साधतां यावी. ध्यान कसें असावें ? श्रीसाईचरित्रांत याबाबतींत कासवीचें सुंदर उदाहरण देण्यांत आलें आहे. कासवी नदीच्या एका कांठाला असते तर तिची पिलें असतात पैलतिराला ! तीं चिमुकली पिलें ! त्यांना आईचें दूध पाहिजे. कब पाहिजे. चारा पाहिजे. त्याच्याविना त्यांनीं जगायचें कसें ? जगण्याचें साधन देवानेंच निर्माण करून ठेविलें आहे. तीं पिलें सदान् कदा आपल्या आईचे ध्यान करीत असतात. तें ध्यान, ती आईशीं एकरूपता त्यांना जगवीत असते. तें ध्यान हाच त्यांचा चारा तेंच त्यांचें दूध आणि त्यांचें अन्न. देवाची करणी आणि नारळांत पाणी ? तसें आहे हें. तीं पिलें आईच्या प्रेमावर जगत असतात. तसाच भक्त देवाच्या प्रेमावर जगत असतो. ती अमृतदृष्टि असते. जगण्यासाठीं जेवलें पाहिजे असें नाहीं. प्रेमामृतावर माणूस जगूं शकतो. ज्यानें भक्तिभावाच्या बळावर देवाला आपलासा करून घेतला, त्याला आणखी कशाची जरूरी भासणार आहे ? देवाचें नामस्मरण, त्याचें सतत ध्यान, मनन, चिंतन हाच त्याच्या भेटीचा सर्वोत्तम मार्ग आहे. ज्ञानी असो; महापंडित असो. भक्तिध्यानाशिवाय सारें व्यर्थ आहे. जेथें ध्यान आहे व भक्ति आहे तेथें अन्य कशाचीही जरूरी नाहीं. मात्र भक्तीची कांस बळकट धरली पाहिजे. तो दयाघन जर कोणत्या एका गोष्टीनें जवळ करतां येत असेल तर तें साधन म्हणजे भक्ति. भगवंतानें सांगूनच टाकिलें आहे कीं, जेथें जेथें माझे भक्त माझें गायन करीत असतात तेथें तेथें माझें वास्तव्य असतें हें निश्चित समजावें.

बाबांनींही पुन्हा पुन्हा व परोपरीनें तेंच आपल्या भक्तांना सांगितलें आहे. 'मग अविद्याकृत कर्मबंध ! तुटती तटातट तयाचे संबंध । तुटती विधिनिषेध निर्बंध । भोगी आनंद मुक्तीचा ।'

तें भक्तिचें वेड तुम्हां आम्हांला सर्वांना लाभो व ज्या असंख्य बंधनानीं आम्हीं जखडले गेलेलें आहोंत, ते सर्व बंध तटातट तुटून आम्हांला मुक्तीचा लाभ होवो, हीच त्याच्या चरणीं अनन्यभावें प्रार्थना.

—संपादक

# हनुमंताचें लंकेंतील यश

“ हनुमानानें जें केलं तें इतर कुणालाहि सुचलं नसतं. एवढा प्रचंड महासागर उड्डान करीत त्यानें ओलांडला. डोळ्यांत तेल घालून तळहातावरच्या फोडासारखं रावण जिला जपत होता त्या लंकेच्या तटबंदी भेदून त्यानें नगरांत प्रवेश मिळविला. इतकंच नव्हे तर कुणाचीच तशी अपेक्षा नसतांहि तो सुग्रीवानें त्याच्यावर सोपविलेल्या कार्यांत यश मिळवून परत आला. ”

हनुमानाला योग्य तें परितोषक देऊन आपण त्याचा यथोचित गौरव करूं शकत नाहीं. या विचारानें रामाचें मन खिन्न झालें. “ हनुमान, तुझ्याविषयीं माझ्या मनांत किती अथांग कृतज्ञता भरून राहिली आहे, हें शब्दांनीं मला सांगतां यायचं नाहीं. या क्षणीं माझ्या या प्रेमळ आलिंगनाखेरीज मी दुसऱ्या कशानेंहि माझ्या मनांतील भावना व्यक्त करूं शकत नाहीं. ”

हनुमानाला प्रेमभरानें आपल्या छातीशीं कवटाळीत राम म्हणाला, “ सुग्रीवा, अद्‌भुत म्हणतात तें या वीराच्या हातून घडलं आहे. राक्षसांचा अहोरात्र जागता पहारा असतांनाहि हा लंकानगरींत जाण्यास धजला. सीतेचा यानें नुसता शोधच काढला एवढंच नव्हे, तर तिचं योग्य प्रकारें सांत्वन करून आत्मघातापासून यानें तिला परावृत्तहि केलं आहे. तो ही सुवार्ता घेऊन आला नसता तर याक्षणीं मीहि तुम्हांला जिवंत दिसलो नसतों.

“ आतां समुद्र ओलांडून लंकेस जाण्याचा मोठाच प्रश्न आपणांपुढें उभा आहे. एवढी मोठी सेना घेऊन आपण हें अवघड कार्य कसं काय पार पाडणार आहोंत ? रावणावर स्वारी करण्यापूर्वी हें समुद्राचं पाणी तर आपल्याला ओलांडून पार व्हायला हवं. मला तरी कांहीं मार्ग सुचत नाहीं. हनुमानानें आणलेली सुवार्ता ऐकून आपणा सर्वांनाच आनंद होणं स्वाभाविक असलं तरी भविष्यकालीन घटनांची अशुभ सावली मात्र या आनंदावर पडली आहे, ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं. ”

रामानें असे ऐन वेळीं हातपाय गाळावेत याचा कांहींच अर्थ सुग्रीवाला समजेना. तो म्हणाला, “ प्रभु, हें काय भलतंच बोलणं ! असं दुःखोद्गार काढण्याचं काय कारण ? तुझ्यासाठीं प्राणार्पण करायला आम्ही सारे एका पायावर तयार आहोंत. तुम्हां उभयतांना लंकेस नेण्याचं उत्तरदायित्व आमचं आहे. आम्ही एवढंहि करूं शकणार नाहीं असा संशय तुझ्या मनांत आला तरी कसा ! लंकेचा पाडाव आम्ही निमिषार्धांत करूं शकू ! तुझ्या मनांत आमच्या शौर्याविषयीं असा संशय आला तर कुणाच्या तोंडाकडे पाहून आम्हीं धीर धरायचा ! हें संशयपटल मनावरून झटकून

टाक. अंतिम विजय आपला आहे याबद्दल मनोमनीं तूं निश्चित ऐस. या क्षणीं माझा मला तरी आत्मविश्वास वाटतो आहे, ही घटना शुभच म्हटली पाहिजे. ”

सुग्रीवानें असा धीर दिल्यानंतर रामानें लंकेच्या नगररचनेविषयीची माहिती हनुमानाकडून विचारून घेतली. मुळीं सुद्धां अतिशयोक्ति न करतां हनुमानानें लंका-नगरीचें आणि तेथील एकूण जीवनाचें साग्रसंगीत वर्णन रामासमोर केलें. रावणाचें सैन्य केवढें अफाट आहे आणि तेथील सर्वच प्रजाजनांची त्याच्यावर असलेली निष्ठा किती जाज्वल्य आहे याची यथोचित कल्पना त्यानें रामाला दिली. लंकेच्या भक्कम दुर्गाचें, नगरीभोंवतीं असलेल्या अभेद्य तटबंदीचें आणि किनाऱ्यावरील कडक पहाऱ्याचें वास्तव चित्र त्यानें रेखाटलें.

नंतर तो म्हणाला,

“ इतकं सारं असूनहि आपली वानरसेना रावणाला धूळ चारल्याशिवाय राहाणार नाहीं., याबद्दल मी निःशंक आहे. अंगद, द्विविद, मैंद, जांबवान, पनस, नल आणि नील यांसारखे रथी-महारथी आपणापाशीं असल्यादर आपल्याला भ्यायचं तरी काय कारण आहे ? आपलं सैन्य प्रचंड आहे. लंका भस्मसात् करून टाकण्यासाठीं आपल्याला जमिनीवर उतरावंहि लागणार नाहीं. तेथील पर्वतांवर नि अरण्यांत कडे-कोट पहारा असला तरी त्याचं सोयरसुतक बाळगायची आवश्यकता नाहीं. डोळ्याचं पातं लवतं न लवतं एवढ्या अवधींत रावणाची ही सुवर्णनगरी मातीला मिळाल्याचं तूं पाहाशील. आतां एखादा शुभ मुहूर्त पाहिलात कीं स्वारीचं प्रस्थान ठेवायचं, एवढंच काय तें उरलं आहे. ”

भर दुपारीं, उत्तर फाल्गुनी नक्षत्राचा शुभ शकुन साधून वानरसेना दक्षिण समुद्राच्या दिशेनें हालूं लागली.

वाटेंत चालतां चालतां राम, लक्ष्मण आणि सुग्रीव आपापसांत बोलत होते.

“ आपण निघालो आहोंत एवढं जरी सीतेला कळलं असतं तरी तिला किती तरी धीर आला असता, ” असें राम म्हणाला.

पुढें गेलेले सैनिक, शत्रूचे लोक झाडाझुडपांआड लपून तर राहिलें नाहींत ना, त्याचा शोध घेत होते. या एवढ्या प्रचंड सैन्याला अन्नपाण्याची वाण पडणार नाहीं, अशाच प्रदेशांतून हे आघाडीचे सैनिक बाकीच्यांना वाट दाखवीत निघाले होते. वानरसेना झपाझप चालली होती. पर्वत मार्गे पडत होते. अरण्यांमागून अरण्यें तुडविलीं जात होतीं.

अधून मधून राम-लक्ष्मण या उभयतांना सैनिकांच्या खांद्यावर बसविण्यांत येत होतें. क्षणाक्षणाला वानरसेनेचा उत्साह वाढत होता. उन्मादाच्या भरांत ते उड्या मारीत होते आणि ओरडत चालले होते. प्रत्येक सैनिकाच्या तोंडी एकच घोष होता,

“ रावणाला मी मारणार ! रावणाला मी भिडणार, नि मारणार ! ”

नील आणि कुमुद सैन्याच्या अग्रमार्गी राहून वाट काढीत होते. अनेक खंदे योद्धे सैन्याच्या पिछाडीला राहून तिचें संरक्षण करीत होते. राम, लक्ष्मण आणि सुग्रीव सैन्याच्या मधोमध चालले होते. वाटेंत लागणाऱ्या नगरांत किंवा ग्रामांत कोणत्याहि प्रकारचे अत्याचार किंवा लुटालुट होता कामा नये अशी आज्ञा रामानें आधींच दिली होती. तें सैन्य चालत होतें तेव्हां समुद्राच्या गर्जनेसारखा त्याचा आवाज येत होता. त्या आवाजानें दाही दिशा दणाणून गेल्या होत्या. सैनिकांच्या पावलांनीं उडणारी धूळ उभें नभोमंडळ व्यापून टाकीत होती.

सैन्य महेंद्र पर्वतापाशीं येऊन ठेपलें तेव्हां राम शिखरावर चढला आणि समुद्राचें निरीक्षण करूं लागला.

"आपल्या सैन्याला हा महासागर पार करून पलीकडे कसं जातां येईल याचा विचार आतां आपण करावयास हवा." राम म्हणाला, "आपला निर्णय होईपर्यंत सैन्यानें इथेंच अरण्यांत तळ ठोकून राहावं." सुग्रीवानें योग्य त्या आज्ञा सेनापतींना दिल्या आणि समुद्रकिनाऱ्यावरील अरण्यांत तळ ठोकून बसलेली ती विराट वानरसेना पुढील आज्ञेची प्रतीक्षा करूं लागली.

सर्व सैनिकांची ती व्यवस्था लागल्यानंतर राम-लक्ष्मणांनींहि क्षणभर विश्रांति घेतली. बोलतां बोलतां राम लक्ष्मणाकडे वळून म्हणाला, "आपल्याला प्राणप्रिय असलेली एखादी व्यक्ति आपणांपासून दूर जाण्याचा योग आला तर कालांतरानें आपल्याला त्या व्यक्तीचं विस्मरण होतं, असं म्हणतात. त्यामुळें विरहव्यथेची आंचहि बरीचशी कमी होत असावी. पण माझ्या बाबतींत तरी हें खरं आहे, असं मला वाटत नाहीं."

सीतेच्या विचारानें राम पुन्हा उद्विग्न झाला. इतका कीं अखेर त्याला आपलें रडूंहि आवरतां आलें नाहीं.

"रावण बळजबरीनें आपलं अपहरण करीत आहे ही गोष्ट सीतेच्या लक्षांत येतांचक्षणीं तिनें 'हा नाथ! हा राम! हा लक्ष्मण!' असा आक्रोश निश्चितच केला असला पाहिजे." तो म्हणाला, "पण तरीहि आपल्या साहाय्यार्थ कोणींहि धावून येऊं नये, हें पाहिल्यावर तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल? हा विचार ज्या ज्या वेळीं माझ्या मनांत येतो त्या त्या वेळीं माझ्या अंगावर कांटा उभा राहातो. जनकराजाची सुकन्या, दशरथ राजाची स्नुषा तिथें लंकेंत उघड्या जमिनीवर पडली आहे. किती मनस्वी वेदना होत असतील तिला आपली शोचनीय अवस्था पाहून!"

"राम," लक्ष्मण त्याला धीर देऊं लागला, "ही वेळ दुःख करीत बसण्याची नव्हे. रावणाचा सर्वनाश आतां कांहीं फार दूर नाहीं. लवकरच सीतामाईची मुक्तता

होईल नि तिचे सोन्याचे पाय अयोध्येला लागतील. एखाद्या देवतेसारखी ती नगर-प्रवेश करील. म्हणून या क्षणीं तूं आपला धीर खचूं देऊं नकोस."

सर्वच महाकवींच्या काव्यांत आपणांस एक वैशिष्ट्य आढळून येतें. खल-पुरुषांची व्यक्तिचित्रे रेखाटतांना ते अधून मधून त्यांच्या स्वभावांतील चांगुलपणाचेंहि दर्शन आपणांस घडविण्याची काळजी घेतात. या त्यांच्या दर्शनांत त्या खलपुरुषाबद्दल त्यांच्या मनांत असलेली सहानुभूतीची भावनाहि आपणांस स्पष्टपणें दिसत असते.

सात्त्विक मार्गावर वाचकाचे लक्ष केंद्रित करणें हा कवीचा उद्देश असतो. हेंच अंतिम उद्दिष्ट लक्षांत ठेवून, आपल्याला जो परिणाम अखेर साधावयाचा आहे तो साधला जावा यासाठीं ते सर्व प्रकारच्या युक्त्या उपयोगांत आणण्यास मार्गें पुढें पाहात नाहींत. ते जेव्हां राजस आणि तामस स्वभावाचीं व्यक्तिचित्रें रेखाटतात तेव्हां त्या चित्रणामागें हाच हेतु असतो.

राजस आणि तामस प्रवृत्तीचे वाचक स्वाभाविकपणेंच मग अशा व्यक्तींकडे सहानुभूतिपूर्वक पाहूं लागतात. सात्विक गुणाचा ज्यांना स्पर्शहि होणें अशक्य असत अशा सर्वसाधारण बुद्धीच्या वाचकांची तरी यापेक्षां वेगळी प्रतिक्रिया काय होणार ? सात्त्विक स्वभावाची व्यक्तिचित्रें केवळ आपली त्यांवर अंधश्रद्धा बसावी यासाठींच निर्माण केलीं गेलीं आहेत, अशी ते सोइस्कर समजूत करून घेतात आणि आपल्यासारखेंच प्रकृतीनें राजस आणि तामस असलेल्या व्यक्तिचित्रांकडे ते आपले-पणानें पाहूं लागतात. अशा व्यक्तिचित्रांचा सर्वसाधारण वाचकांवर फार मोठा परि-णाम होतो आणि आदर्श गिरवावा तर यांचाच, असें त्यांना वाटूं लागतें.

बायबलमधील कथाबीज घेऊन लिहिलेलें 'पॅराडाइज् लॉस्ट्' हें महाकाव्य जगद्विख्यात आहे. या महाकाव्यांत मिल्टननें परमेश्वर आणि त्याचा आध्यात्मिक वारसदार येशू ख्रिस्त यांच्या व्यक्तिचित्रांबरोबरच इतरहि अनेक देवदूतांचे रेखाटन केलें आहे. पण या सर्वांत कोणती व्यक्तिरेखा ठसठशीत उठत असेल तर ती परमेश्वरा-विरुद्ध बंड पुकारून या जगांत पाप व विनाश यांचें बीजारोपण करणाऱ्या सैतानाची ! या बाबतींत मिल्टननें मिळविलेलें यश हें आंग्ल काव्याच्या टीकाकारांना सर्वांस मान्य आहे. दिगंतकीर्ति नाटककार व कवि शेक्सपियर यानें निर्मिलेल्या शॉयलॉक् या व्यक्ति-रेखेबद्दलहि हेंच म्हणतां येईल. दुर्गुणांनीं परिपूर्ण असलेल्या अशा खलपुरुषांचें चित्रण करतांना त्यांचें धैर्य, निश्चय, सामर्थ्य, इत्यादि गुणांवर कवि कटाक्षानें प्रकाशझोत टाकतो आणि त्यामुळें आपण अशा खलपुरुषांकडे आकर्षित होतों. या व्यक्तींच्या स्वभावांतील काळाकुट्ट रंग या प्रकाशझोताच्या पार्श्वभूमीवर अधिकच भयंकर दिसूं लागतो. रावण व कुंभकर्ण या दोन व्यक्तिरेखा चितारतांना वाल्मीकींनींहि याच कलात्मक कौशल्याचा उपयोग करून घेतला आहे. सर्व प्रकारच्या माणसांना आवडेल असें जेवण तयार कर-

ण्यांत वाकबगार असलेल्या एखाद्या स्वैंपाक्यानें कडू कार्ल्यांची भाजीहि सगळ्यांना आवडावी या हेतूनें आपलें सारें कौशल्य पणास लावावें, तसाच हा प्रकार आहे. दुष्टाचें चित्रण करणारा कवि तरी यापेक्षां वेगळें असें काय करतो ?

हनुमानानें लंकेंत मिळविलेलें यश रावणाला खुपूं लागलें होतें यांत नवल कांहींच नाहीं. एवढ्यावरच भागतें तर निराळी गोष्ट होती. पण हनुमानाचा तो अभूतपूर्व पराक्रम पाहून आतां त्याची त्यालाच लाज वाटूं लागली होती. हनुमानाचा नुसता विचार जरी मनांत आला तरी रावणाच्या पोटांत भीतीचा गोळा उभा राहूं लागला होता. म्हणूनच पुढें काय करायचें याविषयीं आपल्या मंत्रिमंडळाचा विचार घेण्यासाठीं त्यानें सर्व मंत्र्यांना पाचारण करून बोलावून घेतलें व तो म्हणाला, "जें जें कांहीं घडलं आहे तें तें सर्व विचित्र नि अनपेक्षित असंच आहे. लंकेची अभेद्य तटबंदी ओलांडून आजवर आंत कुणी प्रवेश करूं शकला नव्हता. पण या रामदूतानें तर या सर्वांवर मात केली आहे. नुसता लंकेंत प्रवेश करून तो थांबला नाहीं, तर कारागृहवासांत असलेल्या सीतेची भेट घेऊन तो तिच्याशीं बोलणीहि करून गेला आहे. नगरींतील अनेक प्रासाद आणि मंदिरं त्यानें उध्वस्त केली आहेत. आमचे अनेक पट्टीचे योद्धे त्यानें यमसदनीं धाडले आहेत. आमच्या प्रजेच्या मनांत त्यानें भीतीचं वातावरण निर्माण केलं आहे. एवढ्याच-साठीं यापुढचीं पावलं आपणांस जपून टाकायला हवींत. दूरदृष्टि आणि मुत्सद्दीपण असलेल्या राजनिष्ठ मंत्र्यांच्या विचारानेंच राजानें आपले पुढिल पवित्रे टाकावेत, असं म्हणतात. आज तुम्हांला मी इथें कां बोलावून घेतलं आहे, हें एव्हांना लक्षांत तुमच्या आलंच असेल. आपला शत्रु राम अधिकाधिक प्रबळ होत चालला आहे वेळींच त्याला कांहीं पायबंद घालायला हवा.

"अप्रामाणिक, संशयात्मे व अंगचोर अशा मंत्र्यांचा आज राजाला काडीचा उपयोग नाहीं.

"आपल्यापुढें असलेला प्रश्न मोठा बिकट आहे. तेव्हां मला काय तो सल्ला देतांना अगदीं मोकळ्या मनानें तो द्या. रामाप्रमाणेंच त्याचं सैन्यहि सामर्थ्यवान् आहे. कांहींहि करून ते महासागर ओलांडल्याशिवाय आतां राहात नाहींत. तेव्हां आपली संरक्षणाची सर्वच भिस्त केवळ समुद्रावर टाकण्यांत अर्थ नाहीं. आपल्या सामर्थ्यांत वाढ होऊन आपली नगरी नि सैन्य सुरक्षित कसं राहील आणि स्वसंरक्षणार्थ आपण कोणत्या मार्गांचा अवलंब करावा, या दोन प्रश्नांबाबत मला तुमचा विचार हवा आहे."

रावणाचें म्हणणें ऐकल्यावर त्याचे सर्व सचिव एकमुखानें म्हणाले.

"महाराज ! आपलं सैन्य नि आपलीं शस्त्रास्त्रं ही या जगांत अजोड आहेत. असं असतांना आपण मनाला अकारण घोर कशालाठीं लावून घेतां ? आपल्या दुर्गावर धडक मारण्याचं धारिष्ट्य करणारा शत्रू अजून जन्मास यायचा आहे. आपल्या सैन्याला सामोरं येण्याचा आततायीपणा कोण दाखविणार आहे ? महाराजाचं स्वतःचं

सामर्थ्य तर लोकविख्यात आहे. भोगावतीवर स्वारी करून नागांचा पराजय आपणच केला होता ना? सर्वशक्तिमान् म्हणून गणल्या गेलेल्या कुबेराला त्याच्या यक्षसैन्यासह खडे चारून त्याचं पुष्पक विमान नि ही लंकानगरी आपणच जिंकली होती ना? मयानें आपल्याशीं स्नेहसंबंध जोडले नि स्वतःची कन्या आपणांस दिली ती आपल्या सामर्थ्याच्या भीतीमुळेंच ना? पाताळांत अशी एक तरी नगरी शिल्लक आहे का, कीं जी आपल्या अजून स्वतःच्या सार्वभौमत्वाखालीं आणलेली नाहीं? कालकेयांचा मद उतरविला तो आपण ना? वरुणाचे पुत्र नि प्रत्यक्ष यमदेव यांना नाकदुऱ्या काढायला लावलं तें महाराजांनींच ना? हा राम कोण लागून गेलाय् एवढा? त्याची नि त्याच्या वानरसेनेची पुरी खोड जिरवायला आमचा इंद्रजित पुरेसा आहे. देवाधिदेव इंद्रालाहि कारागृहांत डांबून ठेवून नंतर सोडून देणारा एकटा इंद्रजित पुरे आहे. त्याच्यापुढें उभं राहायचं धैर्य तरी आहे का रामांत? इंद्रजिताला आज्ञा देण्याचा अवकाश, कीं तो त्याचा पुरा समाचार घेईल; मग महाराज, आपण एवढी चिंता करण्याचं कारण काय?"

मग एखादा काळाकभिन्न ढग आकाशांत दिसू लागावा तसा रावणाचा प्रमुख-सेनापति प्रहस्त बोलायला उभा राहिला. तो म्हणाला,

"महाराज, देव, दानव आणि गंधर्व यांना आपण युद्धांत जिंकलं आहे. आपण सम्राटांचेहि सम्राट असतांना या क्षुद्र कीटकांची भीति कशासाठीं बाळगायची? एखादं माकड इथें आलं नि आपण बेसावध आहांत असं पाहून त्यानें थोडीफार नासधूस केली, एवढ्यावरूनच आपण भांबावून जायचं कारण नाहीं अशी गोष्ट आम्ही पुन्हां होऊं देणार नाहीं. तें माकड चुकून पुन्हा इथें आलंच तर तें आपलं कंबरडं खिळखिळं करून घेतल्याशिवाय परत जाईल असं आम्हांला वाटत नाहीं. आपण नुसती आज्ञा द्या, मग एकटा उभ्या वानरकुलाचा संहार करून दाखवितों. सीतापहरणासारखी अत्यंत क्षुल्लक गोष्ट आपण इतकी मनावर कशाला घेतां!"

त्यानंतर उठला दुर्मुख. तो म्हणाला, "त्या माकडाच्या अधिक गमजा आम्ही चालू देणार नाहीं. मी आतांच्या आतां जाऊन त्या वानरसेनेचा संपूर्ण नाश करून टाकतों."

त्याच्या पाठोपाठ वज्रदंष्ट्र हातांत एक भली मोठी लोखंडाची कांब घेऊन उभा राहिला आणि गरजला, "हें माझं शस्त्र, ह्याच्यावरचं शत्रूचं रक्त अजून धुतलं गेलेलं नाहीं. त्या माकडाविषयीं चर्चा करण्यांत निष्कारण कशाला वेळ घालवतां? राम लक्ष्मण आपले शत्रू आहेत ना, मग पहिल्याप्रथम मी त्यांना यमसदनास पाठवीन आणि लागलीच वानरसेनेचा खरपूस समाचार घेईन. महाराजांनीं फक्त आज्ञा द्यावी. महाराज माझं ऐकणार असतील तर एक गोष्ट मी सांगू इच्छितों. कांहीं राक्षसांना मानवाचं रूप घ्यायला सांगून त्यांना रामाकडे पाठवावं आणि त्यांनीं रामाला म्हणावं, 'भारतानें आम्हाला पुढें पाठवलं आहे. मागोमाग प्रचंड सेना तुझ्या साहाय्यार्थ येत आहे.' मग राम भारताच्या सेनेची वाट पाहात बसेल आणि ती संधि साधून आपलं सैन्य आपण

आकाशांतून त्याच्यावर घालं नि तिथेंच किनाऱ्यावर त्याचा संपूर्ण निःपात करून टाकूं."


त्यानंतर कुंभकर्णाचा पुत्र निकुंभ उठून उभा राहिला आणि म्हणाला, "तुम्ही सर्वजण इथें महाराजांजवळ राहा. मी आतांच्या आतां जातों आणि क्षणार्धांत रामाची सेना होती कीं नव्हती असं करून टाकतों."

आणखी एक राक्षस जिभल्या चाटीत उठला नि गर्जना करूं लागला, "राम व लक्ष्मण यांच्या मांसावर माझी वासना गेली आहे. मला जाऊं द्या."

रावणाला संतुष्ट करण्यासाठीं ते एकापाठोपाठ एक असे उभे राहात आणि मल-मलत्या वल्गना करीत होते. अखेर सर्वजण एक दम उठून उभे राहिले आणि आपल्या हातांतील शस्त्रें पाजळीत किंकाळ्या मारूं लागले.


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.




**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# माझें जीवन व बाबांची कृपा

लेखक : वा. भा. मगदूम.

बालपणापासून पोरक्या अवस्थेंत वाढल्यानें माझी मनस्थिती बरीच विकृत व हट्टी बनली होती. ज्ञानाच्या लालसेनें मी १९५४ साली मॅट्रिक होऊन सरकारी नोकरींत प्रवेश केला. तशांतच कांहीं स्वार्थी लोकांनीं माझ्यावर अनेक संकटे आणलीं, त्यामुळें मानसिक व शारिरिक अवस्था अधिकच ढासळली. जगणे व्यर्थ वाटूं लागले. जवळ पैसा असूनही जीवन निरर्थक भासूं लागले. बऱ्याच धर्मग्रंथांचा, इथि ऑसफीचा व विवेकानंद साहित्याचे वाचन घडले. त्या वाचनान मन खंबीर झालें पण जीवनाची दिशा सापडेना, परिपूर्णता येईना, मनाचा कोंडमारा होऊं लागला. अशा अवस्थेंत गाण्याच्या उपजत आवडीनें एका बैठकीस जाण्याचा प्रसंग आला, गायक केंद्र सरकारच्या अबकारी खात्यातील प्रथम दर्जाचे अधिकारी होते. बैठकींत त्यांनीं श्री बाबांची भक्तियुक्त सुंदर गाणी म्हटली. मीही श्रीकृष्णाचे एक पद म्हटले. त्यावेळीं बाबांची भक्ति मनांत रुजली. बाबांची प्रतिमा आणून गुरुवारी, शुक्रवारी पूजा करूं लागलो. मनस्थिती बरीच ताळ्यावर आली. नंतर एका गृहस्थाकडून साईचरित्र वाचण्यास मिळालें. तें वाचून बाबा विषयीं वाटणारी भक्ति दृढ झाली. शिरडीस जावून समाधी दर्शन घ्यावें अशी तळमळ वाटूं लागली. पण नोकरीच्या व्यापामुळें जमेना. एक दिवस पगाराची रक्कम घेऊन तसाच पुण्याच्या गाडीत बसलो. शिरडीस आलों. समाधी दर्शनानें मनास धीर आला. कुठल्याही संकटांतून भक्तांचें रक्षण बाबा करतील ही भावना दृढ झाली. बाबांच्या कृपेनें काव्य लेखन करूं लागलों. सध्या आपल्या मासिकात व मराठी वृत्त पत्रांत काव्यलेखन करतों. शरीर मनसुदृढ आहे. बाबांची कृपा आपल्या पाठीशीं आहे या विश्वासानें निर्भय व आनंदी जीवन जगत आहे. श्री. बाबांची सेवा यथाशक्ति घडावी ही आशा आहे, माझ्या विस्कटलेल्या जीवनाची नवी घडी बसत आहे. माझें सामर्थ्य वाढत आहे. ही सर्व बाबांची कृपा. बाबा भक्ताना कधींहि विसरत नाहींत. या वचनाची प्रचिती येण्यास बाबांची निष्ठेनें प्रार्थना करणाऱ्या अनेक लोकांना माझा अनुभव निश्चित खरा वाटेल !!



# गवळण

साई हा मजवरी का रुसला ।।
शोधुन त्याला ऽ
जीव माझा थकला ।
कुठे हरी रमला ।। धृ ।।
किती वानू तुजला ।
कंठ माझा सुकला ।
शिरडीच्या नंदलाला ।
साई हा मजवरी का रुसला ।। २ ।।
गवळण, मी भोळी ।
तुझी वनमाळी ।
विसरू नको मजला ।
साई हा मजवरी का रुसला ।। ३ ।।

—बा. भा. मगदूम

# हाच वाहू अभिमान

हाच वाहूं अभिमान ।
नामे तरले पाषाण ।। धृ ।।
सर्व सुखाचे निधान ।
साई, देवकीनंदन ।। १ ।।
नित्य करावे भजन ।
तुझे चिंतन स्मरण ।
व्हावे तुझ्या पदी लीन ।
मन करोनी प्रसन्न ।। २
होई जीवन कल्याण ।
भरे आनंदाने प्राण ।
तुटे काळाचे बंधन ।
बाबा, गेले रे सांगून ।। ३ ।।

—बा. भा. मगदूम

# भक्तिमार्गाची महती

## एकनाथांचा भागवत धर्म

परमेश्वर संपूर्णपणें ज्ञानगम्य आहे, असें जें ज्ञानमार्गानुयायी लोकांचें म्हणणें आहे त्यांत वादास बरीच जागा आहे; परंतु तें खरें आहे असें आपण गृहीत धरून चाललों तरी, केवळ ज्ञानविषय जें ब्रह्म तें कळलें म्हणजे आपल्या हृदयाचें पूर्ण समाधान होईल असें नाहीं. कारण, ज्ञान संपादन करण्याची इच्छा व बुद्धि यांचा आपण जीं कृत्यें करतों त्यांच्याशीं किती संबंध असतो हें तपासून पाहिलें, तर जिज्ञासा व बुद्धि यांच्या तृप्तीनें मनास शांति होत नाहीं असें आढळेल. परमेश्वरप्राप्त्यर्थ भक्ति होण्यापूर्वीं त्याच्या स्वरूपाचें आपल्या शक्तीप्रमाणें ज्ञान झालें पाहिजे. हे जरी खरें आहे, तरी तें ज्ञान केवळ बुद्धीनें कांहीं प्राप्त होणार नाहीं. कारण, परमेश्वर हृदयगम्य अथवा हृदयांतर्गत ज्या वृत्ति त्यांनाच गम्य आहे यांत संशय नाहीं. वृत्तींवर बहुधा आपलें आचरण अवलंबून असतें. म्हणून वृत्तींस अथवा हृदयास खरें समाधान होईल व त्यास चांगलें वळण लागेल असें करण्यासाठीं भगवंताला वृत्तींच्या आंत आणावयाचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. तसें होण्यास आपल्या अंतःकरणाची सिद्धता पाहिजे. ही होण्यास कांहीं बाह्य उपायांची योजना लागते, जसें सुस्नान, सुस्थल, रम्य, एकांत जागा वगैरे. सुस्नान केलें असतां चमत्कारिक प्रकारची मनाची प्रसन्नता असते; तसेंच उंच पर्वत, खोल दरी, शांत व विस्तृत नदी, अफाट समुद्र यांमध्यें दिसणारी परमेश्वराची अगाध लीला पाहून त्याच्याविषयीं पूज्यभाव व भक्ति विशेष रीतीनें जागृत होतात. एकांत स्थळीं बसलें असतां अन्यविषयवृत्ति होऊन एकाग्रता होण्यास ठीक पडतें. तथापि या साधनांनीं परिपूर्ति होत नाहीं. इंद्रियें व मनोवृत्ति परमेश्वराकडे वळवून त्याच्यामध्यें रममाण होतील व वृत्ति व हृदय ईश्वरमय होतील असें करण्यास सर्वोत्तम साधन प्रार्थना होय. उपासनेंत प्रार्थनेला मुख्य जागा देण्याच्या संबंधानें सर्व धर्मांची एकवाक्यता आहे. ह्यावरून ईश्वरप्राप्तीच्या व ईश्वरभजनाच्या सर्व साधनांत प्रार्थना प्रधान आहे असें सिद्ध होतें. उपासना म्हणजे ओतप्रोत प्रार्थनेनें युक्त असते. आदीं व अंतीं तर प्रार्थना असतेच व मध्यें जरी निरूपण अथवा उपदेश असतो, तरी प्रारंभीं मध्यंतरीं प्रार्थना, व शेवटास प्रार्थना केली, तर वावगें नाहीं, इतकेंच नाहीं, तर योग्यच होईल. निरूपण अथवा उपदेश हा उपासनेचा गौण भाग व प्रार्थना हेंच तिचें खरें स्वरूप म्हटलें असतां चालेल. लोकांमध्यें प्रचलित असलेला जो कर्ममार्ग त्याच्यापेक्षां भक्तिमार्ग

और कसा, याविषयीं एकनाथमहाराजांच्या वचनांचा विचार, त्यासंबंधाचे वेंचे आधारभूत घेऊन, करूं या.

सृष्टींतून सर्व धर्मानुयायीं लोकांमध्यें कर्ममार्ग असतो, व तो सर्वत्र विधिनिषेधरूपी म्हणजे शास्त्रविहित कर्में करणें व तन्निषिद्ध जीं त्यांचा त्याग करणें अशा प्रकारचा असतो. तो महंमदी धर्मांत आहे व ख्रिस्ती धर्मांत नाहीं, किंवा वेदोक्त धर्मांत आहे व झरतुस्ती धर्मांत नाहीं, असा प्रकार नाहीं. आपल्या या आर्यभूमींत त्याचें विशेष लक्षण जें आहे तें हेंच की, तो वर्णाश्रमधर्माशीं संबद्ध आहे. हें कर्ममार्गाचें स्वरूप व त्याचा वर्णाश्रमधर्माशीं अत्यंत निकट संबंध हीं दोन्हीं—

ज्यासी भगवद्‌जनीं विश्वासू । विधिनिषेध त्याचा दासू ॥
देवोनि निजभजनविलासू । स्वयें जगन्निवासू सुखावे ॥ १ ॥
भजनप्रताप संतलक्षणें । स्वधर्माकर्मा ऐसें दंडणें ॥
वर्णाश्रमाचा ठाव पुसणें । होळी करणें कर्माची ॥ २ ॥

२. ३३८, ३४३.

या दोन ओव्यांत एकनाथमहाराजांनीं थोडक्यांतच अशा सुंदर रीतीनें व स्पष्टपणें सांगितली आहेत कीं, त्यांचा विस्तार करणें नलगे. एकनाथमहाराज सांगतात कीं, भगवंताच्या भक्तींत तल्लीन असून तद्द्वारा परमेश्वरप्राप्ति होईल असा ज्या पुरुषाचा दृढ विश्वास आहे त्याचा विधिनिषेधरूपी कर्ममार्ग केवळ दास बनतो; म्हणजे त्या पुरुषावर इतर लोकांप्रमाणें कर्ममार्गाचा अंमल चालणें एकीकडेसच राहून, तो अशा महात्म्यापुढें हात जोडून दूर उभा राहतो व त्याला भक्तिजन्य आनंद होतो, इतकेंच नाहीं, तर परमात्म्यालाही त्याची भक्ति व भाव पाहून सुख होतें. हा वर्णाश्रमधर्मरूपी विधिनिषेधात्मक जो कर्ममार्ग त्याचें बंड या देशांत योगमार्ग व ज्ञानमार्ग या दोहोंपेक्षां फारच अधिक असल्यामुळें एकनाथमहाराजांचा त्यावर कटाक्षही अधिक आहे.

योगमार्ग व ज्ञानमार्ग यांच्यापेक्षां भक्तिमार्गाची श्रेष्ठता सिद्ध करितांना ते कठिण, दुष्कर, व सर्वांस गम्य नाहींत एवढीच उणीव दाखविली आहे. योगमार्गी असें म्हणतात कीं, आसन, प्राणायाम, ध्यान वगैरे साधून इंद्रियांचा समूळ नाश अथवा मोड झाला पाहिजे, तरच भगवत्प्राप्ति होण्याची शक्यता, नाहीं तर नाहीं. या मार्गाचें काठिण्य आपणांस मी लक्षणानें दाखवितों, म्हणजे सहज खात्री होईल. योगमार्ग म्हणजे नदीस प्रचंड पूर आला असतां, सांगड वगैरे न घेतां व कोणाच्याही मदतीची अपेक्षा न करितां, उडी मारून स्वतःच्या सामर्थ्यानें पोहून जाऊन अचानक पैलतीरास जाण्यासारखें आहे. असें ज्या भाग्यशाली पुरुषाच्या अंगीं महदभ्यासानें सामर्थ्य आलें असेल त्यानें कांचा मारून, इंद्रियांचा निरोध करून, त्या मार्गाचें खुशाल अवलंबन करावें; त्यानें तसें करूं नये असें नाथांचें अथवा आमचें म्हणणें नाहीं. ज्ञानमार्गाकडे दृष्टि वळविली, तर तोही महापुरांतून कांहीं अंशीं

स्वतःच्या सामर्थ्यानेंच परंतु क्रमाक्रमानें पैलतीरास जाण्याविषयीं प्रयत्न करण्यासारखा आहे. त्यांत धडपड करून पोहत पोहत निम्मीशिम्मी मजल झंपावी; मध्येंच कांहीं चूक झाली असतां एकाद्या भोंवऱ्यांत सांपडून घोटाळावें व पुनः मागें, पुनः पुढें, याप्रमाणें पुढें जाण्यास प्रयत्न करावा, म्हणजे सुदैवानें कदाचित् परतीर लाभेल असा हा मार्ग आहे. या दोन्ही मार्गांमध्यें भावाची मदत अथवा संतसमागमाचें साहाय्य यांचा अभाव असल्यामुळें तद्द्वारा भगवत्प्राप्ति दुर्घट, अतएव सामान्य जन त्यांच्या खटपटीस पडत नाहींत. परंतु कर्ममार्गाचा प्रकार वेगळा आहे. त्याचे अनुयायी म्हणतात कीं, आम्हांस महापुरांतून पार जावयाचें आहे, परंतु तें नावेंत बसून जाऊं. या नौका, दानें, तीर्थयात्रा वगैरे अनेक प्रकारच्या आहेत. कोणी म्हणतो मी सहस्र गोदानें करीन; कोणी म्हणतो, मी ब्राह्मणभोजनें घालीन; कोणी म्हणतो मी तीर्थयात्रा करीन; गंगेची कावड रामेश्वरास नेईन; रामेश्वराची वाळू विश्वेश्वरास वाहीन; काशीस जाईन; प्रयागास जाईन; जगन्नाथापासून द्वारकेस जाईन; पृथ्वीप्रदक्षिणा करीन; पुरश्चरणें करीन. या मार्गाचा फैलाव फार, म्हणून भागवतधर्माशीं तुलना केली असतां "ज्यासी भगवद्भजनीं विश्वासू । विधिनिषेध त्याचा दासू" असें म्हणून त्याचें दैन्य दाखविलें आहे, व स्वधर्मकर्मा ऐसें दंडणें ॥ वर्णाश्रमाचा ठाव पुसणें ॥ होळी करणें कर्माची ॥ या वचनांत त्याचा ठाव पुसून टाकावा म्हणजे मागमूस नाहींसा करावा व जाळून भस्म करावा, अशा कडक शब्दांची योजना केली आहे.

आणखी, योग, ज्ञान व कर्म या तिन्ही मार्गांत ज्या वेदशास्त्रांचीं मातब्बरी मान्य केली आहे त्यांचें मुळींच ज्ञान नसतांही भक्तिमार्गानें उद्धार होतो असें ह्या ओंव्यांत म्हटलें असून—

जो श्रुतीस्मृति नेणता । भावें भजे भगवत्पथा ॥
त्यासि विधिनिषेधबाधकता । स्वप्नींही सर्वथा प्रमाद न घडे ॥ १ ॥ श्रुतिस्मृति दोन्ही डोळे । तेणेंविण जे आंधळे ॥ तेही हरिभजनीं धांवतां भावबळें । पडेना आडखुळे सप्रेमयोगें ॥ २ ॥ ऐसें आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कदा कर्म ॥ कर्मासि ज्याची आज्ञा नेम । तो पुरुषोत्तम भजनामाजीं ॥ ३ ॥ एवं भागवतधर्मे जे सेवक । स्वधर्मकर्म त्यांचें रंक ॥ तें गाहों न शके त्यां सन्मुख । मा केवि बाधक हों शकेल ॥ ४ ॥

२. ३२९, ३३१, ३६५, ३४४.

शेवटच्या दोन ओंव्यांमध्यें ज्या भगवंताच्या आज्ञा वेदांस व तन्नियुक्त कर्मांस शिरसावंद्य तोच ज्यांच्या सप्रेम भजनामध्यें उभा असतो अशा भक्तांपुढें वर्णाश्रमधर्मकर्में केवळ रंक होतात, असें एकनाथमहाराज म्हणतात. या शेवटच्या ओंवींत "रंक"

ह्या शब्द मुद्दाम योजिला असावा असें मला वाटतें. रंक शब्दाचा अर्थ सेवक असा नव्हे; रंक म्हणजे साधारण सेवकापेक्षां कमी दर्जाचा नोकर—सेवकाचा सेवक. अमेरिकेंत वगैरे ज्याप्रमाणें सेवक निराळे व गुलाम अथवा दास निराळे, तशाच प्रकारचा भेद सेवक व रंक यांत आहे. प्रसंगीं सेवक आपल्या पुढें उभे राहूं शकतात, परंतु रंकास समोर उभें राहण्याचाहि अधिकार नाहीं. अशा रंकांच्या स्थितीस वर्णाश्रमधर्मकर्में पोहोंचलीं म्हणजे त्यांच्यापासून भवसागर तरण्याला, अथवा भगवत्प्राप्तीला अडथळा कसचा होणार ? या सर्व वचनांवरून व वर्णाश्रम-धर्मांचा ठाव पुसा, स्वधर्मकर्माला दंडा म्हणजे आपल्या हुकुमांत ठेवा, कर्मांची होळी, रांगोळी करा, असें सांगण्यावरून एकनाथमहाराजांची या वर्णाश्रमधर्मांतील विधिनिषेधरूप कर्ममार्गाविषयीं अश्रद्धा व तिटकारा हीं दिसून येतात.

आतां योगमार्गाविषयीं किंवा ज्ञानमार्गाविषयीं इतकी अश्रद्धा एकनाथमहाराजांनीं दाखविली नाहीं आणि कर्माविषयीं दाखविली याला एक सबळ कारण आहे. योगमार्गानें जडता कमी होते, निदान वाढत तरी नाहीं. आपणा सर्वांना त्याचें अनुष्ठान थोडेंबहुत करावें लागतें. कारण आपण इंद्रियांच्या अगदींच स्वाधीन झालों व त्यांस वाटेल तसें करूं दिलें, तर आपण केवळ पशु बनून जाऊं; म्हणून प्रत्येक व्यक्तीनें कांहीं अंशीं तरी इंद्रियनिग्रह केलाच पाहिजे. ज्ञानमार्गांत आपली जिज्ञासा व बुद्धि यांचा विकास होऊन आपण ज्ञान संपादन करतों व तेणेंकरून मतीचा विभ्रम दूर होऊन आपण चित्स्वरूप आहों असें कळूं लागतें व अर्थात् जडता कमी होते. योगमार्गांतील स्वतःच्या सामर्थ्यानें पोहून जाणें व ज्ञानमार्गांतील वरचेवर येणारे भोंवरे व चौऱ्यांयशीं लक्ष फेऱ्यांतून पार पडणें हीं आम्हांसारख्या भाळ्याभोळ्यांस दुःसाध्य असल्यामुळें नकोत. आम्हांस सोप्यांत सोपा सुलभ मार्ग पाहिजे. त्याचें दुसऱ्या एका वेळच्यांत एकनाथमहाराजांनी वर्णन केलें आहे, त्याविषयीं पुढें मला विस्तारानें बोलावयाचें आहे म्हणून आजच्या प्रसंगीं निरूपण करीत नाहीं. या योगमार्गांतिल व ज्ञान-मार्गांतील अडचणी टाळण्यासाठीं कर्ममार्गाचें अनुष्ठान केलें, तर जडता अधिक वाढते व जे आपण चित्स्वरूप असतों तें जड बनतों.

आपण चित्स्वरूप आहों, तरी शरीराचा संबंध असल्यामुळें जडता नैसर्गिकच आहे. याचें उदाहरण पाहिजे तर लहान बालकाकडे पाहावें. त्याला कांहीं वेळपर्यंत ऐकू येत नाहीं बोलता येत नाहीं, मुळींच समजत नाहीं, अशी अगदीं जड स्थिति असते. नंतर जसजसें ज्ञान वाढत जातें तसतसा मनुष्य ज्ञानस्वरूप होऊन परिणामीं त्याला आपलें खरें स्वरूप कळूं लागतें. तसेंच आपलें ज्ञान वाढत जाऊन चित्स्वरूपतेचा लाभ झाला तरी जडता राहतेच. रात्रीचे दहा वाजले कीं आपले डोळे मिटूं लागतात; क्वचित् झोंप वेळेवर तर काय, परंतु मुळींच येत नाहीं, असें होतें. परंतु ती रोगाची दशा—ती विकृत स्थिति, तो भाग निराळा. आम्हांस भूक, तहान लागावयाची ती लागत. हे सर्व जडतेचेच प्रकार

आहेत. आणि आपल्याला तर जडता कमी करणें आहे. म्हणून ही जडता वाढविणारा जो कर्ममार्ग त्यावर एकनाथमहाराजांनीं विशेष कटाक्ष धरिला आहे, तो यथार्थ आहे. आजन्म तीर्थयात्रा करणारांच्या अंगीं पहावें तर जडता व अभिमान हीं मात्र वाढलेलीं दिसतात. सुक्षेत्रीं व सुस्थळीं जाण्याचें मुख्य उद्देश, परमेश्वराची अगाध लीला व चातुर्य पाहून त्याच्याकडेस मन वळावें, साधुसंतांतांचा समागम होऊन आपल्या अंगीं सद्गुणांची वृद्धि व्हावी हा आहे. तें अतिपरिचयामुळें एकींकडेच राहून येथचें पाणी तेथें नेलें, तिकडचीं वाळू इकडे आणली, यांतच कृतकृत्यता वाटून अभिमान वाढतो. यापलीकडे कांहीं खरा लाभ होत असेल असें दिसत नाहीं. जप, तप, होम, हवनें यांची तरी हीच दशा. म्हणे छप्पन्न लक्ष जप झाला. पहावें तर इतके वेळ मणी ओढण्याखेरीज दुसरें कांहीं झालें नाहीं! लक्ष आवर्तनें झालीं, मनावर संस्कार पहावा तर भोपळ्याएवढें पूज्य! एकंदरीनें या कर्ममार्गाच्या प्रकारापासून जडता वाढतें; व तितक्यानेंच भागत असें नाहीं. तर अहंपणा इतका प्रबळ होतो, कीं, आपल्याप्रमाणें कोणीं केलें नाहीं, अथवा आपण जें कांहीं करतों त्याच्या उपयुक्ततेविषयीं कोणीं शंका काढली कीं, पायांची तिडीक डोक्यास चढून त्याची निर्भर्त्सना करावयास प्रवृत्ति होते. जप, तप, तीर्थें व्रतें करून तामसीपणा व अभिमान कमी अथवा नाहींसा होण्याऐवजीं सहनशीलतेवर पाणी पडलें, तर दुसरें काय म्हणावयाचें? हा कर्माभिमान वाढत जाऊन आपल्या देशांत असा कांहीं विलक्षण प्रकार झाला कीं, देव अथवा देवता एकीकडेच राहून मंत्रांसच देव मानूं लागले, आणि मंत्रयुक्त आहुति दिल्या असतां देवता खेंचून आणितां येतात इतकें सामर्थ्य मंत्रापर आरोपूं लागले!

चहूंकडे व्रतें, उपोषणें यांचेंच माहात्म्य दृष्टीस पडतें. तीं केल्यापासून ज्ञानप्राप्ति म्हणाल तर मुळींच नाहीं. मीं अमुक व्रतें व उद्यापनें केलीं, त्याच्या हातून तीं झालीं नाहींत, म्हणून मी थोर, पुण्यशील; तो लहान तो पापी, असा अभिमान मात्र उत्पन्न होतो व मीं आडवा, तुम्ही उभे; मी समोर, तुम्ही वांकडे, वगैरे टिळ्यासारख्या यःकश्चित् गोष्टीच्या संबंधानें हाणामार होंपर्यंत वाद होतात. मुख्य भाग एकीकडेसच रहातो. केवळ कोणतेंहि कर्म वाडवडील करीत आले, अथवा एखाद्या शास्त्रग्रंथांत सांगितलें आहे म्हणून करणारांचा प्रकार निराळा असतो. त्यांच्यासंबंधानें एकनाथमहाराजांचें म्हणणे नाहीं. त्यांचा कटाक्ष कर्माभिमानी लोकांवर आहे; जडता आणणाऱ्या कर्मांची होळी झाली नाही, हीं कोठें होतीं कीं नव्हतीं, याचा पत्ता नाहींसा केला नाहीं, व कर्माभिमान जाळून भस्म केला नाहीं, तोंपर्यंत भगवद्भक्तीच्या मार्गांत आपली प्रगति होणार नाहीं; म्हणूनच या मार्गावर महाराजांची करडी नजर आहे.

कर्ममार्ग म्हणजे विधिनिषेध मुळींच पाळूं नये, असें महाराजांचें म्हणणें नसून, विधिनिषेधास आपला स्वामी होऊं देऊं नका; त्यास रंक करून ठेवा, हेंच ह्या ओव्यांचें

तात्पर्य आहे. तुम्ही नम्रतादर्शक नमस्कार, किंवा रामराम करावा, इत्यादि विहित आहे तें करूं नये असें कोणीहि म्हणणार नाहीं. परंतु फलाण्यानें नुसता नमस्कार केला, कीं रामराम केला, किंवा सलाम केला, कीं जयगोपाळ म्हटलें, इत्यादि पोकळ व द्वेष वाढविणारे वितंडवाद कर्ममार्गापासून उत्पन्न होतात, ते मात्र नकोत. त्याच्यायोगें नम्रता वाढण्याचा उद्देश एका बाजूस राहून आपण जड होतों व अभिमानाचे दास बनतों. म्हणूनच कर्ममार्गाची नव्हे, तर तज्जन्य जडतेची, अभिमानाची, दुराग्रहाची व वैरभावाची होळी करा, त्यांचा ठाव पुसून टाका, मागमूस नाहींसा करा, असें महाराजांचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं—

भागवतधर्मे जे सेवक स्वधर्मकर्म त्यांचे रंक ॥

२-३४४

यावरून विधिनिषेध समूळ नाहींतसे करावे, असें त्यांचें मत नसून त्यास रंक करावें असें त्यांचें म्हणणें दिसतें. एकादा सधन मनुष्य पडत्या दशेंत आला व दरिद्री झाला म्हणजे त्याच्याशीं जे पूर्वी अदबीनें वागणारे सेवक असतात तेच त्याच्या डोक्यावर बसावयास तयार होतात, तसें होतां नये. कर्ममार्गाच्या व त्यापासून होणाऱ्या जडतेच्या आणि अभिमानाच्या सर्वथा आधीन न होतां, त्यास आपल्या दाबांत ठेवावें. कर्मांचा व कर्मठपणाचा अभिमान वाढूं दिला, म्हणजे त्यापासून लढाया, मारामाऱ्या व रक्तस्राव होऊन धर्माची वृद्धि न होतां, उलट द्वेष व प्राणहानि निष्पन्न होतात, व शहरांचीं शहरें ओस पडतात, असे अनर्थ होतात म्हणूनच कर्ममार्गा-वर, म्हणजे तज्जन्य अभिमानावर व जडतेवर एकनाथमहाराजांचा विशेष रोख आहे व त्यास आपले रंक म्हणजे त्यांनीं हात जोडून एका कोनांत उभें राहावें व आज्ञा होईल तेव्हां पुढें यावें असें करा, म्हणून त्यांनीं उपदेश केला आहे. व

हेतुक अथवा अहेतुक । वैदिक लौकिक स्वाभाविक ॥
भगवंतीं अर्पे सकळिक । या नांव देख भागवतधर्म ॥ १ ॥ २-३४६

अशी एका स्थलीं भागवतधर्माची व्याख्या केली आहे. यासंबंधानें पुढें पुष्कळ बोलावयाचें आहे म्हणून आज येथेंच भाषण पुरें करतों.

एकनाथमहाराज सांगतात कीं—

जो श्रुतिस्मृति नेणता । भावें भजे भगवत्पंथा ॥
त्यासि विधिनिषेधबाधकता । स्वप्नींही सर्वथा प्रमाद न घडे ॥ २-३२९

श्रुति म्हणजे वेद व स्मृति म्हणजे शास्त्रें, यांचे अध्ययन झालें असलेला पुरुष भग-वद्भक्त असेल, तर ज्ञानाचें भक्तीला पुष्टीकरण होईल व तो मोठाच अधिकारी झाला; परंतु तशी स्थिति नसली, वेदशास्त्रें मुळींच जाणत नसला, तरी जर तो भावानें, एकनिष्ठेनें भक्तिमार्गास, अथवा भजनमार्गास अनुसरणारा असेल, तर त्याला विधिनिषेधरूपी वर्णाश्रमधर्माची बाधा, पीडा, किंवा प्रत्यवाय जागृतावस्थेंत

तर काय, परंतु स्वप्नांत तरी होईल अशी शंका नको. वेदशास्त्रें न जाणणारे तुम्हांआम्हांसारखे अज्ञान जन जर भावानें भगवद्भक्ति करितील, तर त्यांस विधिनिषेधाची बाधा होणार नाहीं, असें एकनाथमहाराज प्रतिज्ञापूर्वक सांगतात. याच अर्थाचा विस्तार पुढल्या

श्रुतिस्मृति दोनी डोळे । तेणेंविण जे आंधळे ।
तेहि हरिभजनीं धांवतां भावबळें । पडेना आडखुळे सप्रेमयोगें ॥ १ ॥ २–३३१
ऐसे आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कदा कर्म ।
कर्मासि ज्याचि आज्ञा नेम । तो पुरुषोत्तम भजनामाजी ॥ २ ॥ २–३३५

ह्या दोन ओव्यांत फार मार्मिक रीतीनें केला आहे. श्रुतिस्मृतिरूप डोळे ज्यांस नाहींत ( चर्मचक्षु बहुतेकांस असतात, परंतु ज्ञानचक्षु अथवा ज्ञानदृष्टि फारच विरळा ) असें हरिभजनीं धांवूं शकतात व अडखळून पडत नाहींत.

ज्ञानमार्गानें ब्रह्मप्राप्ति करून घेण्यास जाणारांची फार त्रेधा उडते. त्यांस मुळींच धांवावयास येत नाहीं; कारण त्यांचें मन कधीं शंकारहित नसतें. त्यास भगवंताची भेट होण्याचें कारण एकीकडेसच राहून ते ब्रह्म निराकार, निर्गुण आहे, तेंच सत्य, इतर सर्व माया आहे; जग मिथ्या आहे वगैरे नाना प्रकारच्या शंकांत व वादांत पडून इतके घोटाळून जातात कीं, जसें पायघोळ धोतर नेसलेला मनुष्य जलदीनें चालावयास लागला असतां तें त्याच्या पायांत येतें व तो अडखळून पडतो, त्याचप्रमाणें त्यांची स्थिति होते. सदैव साशंक असल्यामुळें ते घोटाळतात. परंतु तुमच्या आमच्यासारखें साधेभोळे अडाणी गरीब लोक जर भावानें, निष्ठेनें हरिभजन करितील, तर त्यांस तसे अडथळे येणार नाहींत. ज्ञानमार्गाप्रमाणेंच योग्यांचा व कर्ममार्ग्यांचा प्रकार; कर्ममार्गांतील व्रतें, उद्यापनें करणारांस माहीत आहेच कीं, त्यांत किती हरकती येतात. साधारण सोंवळेंओवळें मानण्याची रीत पाहूं गेल्यास तिजमध्यें किती तरी अडाणीपणा व विनाकारण त्रास असतो. पल्लिपतन म्हणून जो याच मार्गांतला अत्यंत अडाणी प्रकार आहे त्यांत हातांवर पाल पडली तर काय होतें; मनगटांवर पडली तर काय होतें; बोटांवर पडलीं तर काय होतें; पायांवर पडली तर काय होतें; उजव्या खांद्यावर पडली तर काय होतें; अशा शेंकडों असमंजस समजुती आहेत. अशा जडतेमुळें मनुष्याची प्रगति होत नाहीं. तो पुनः पुनः भोंवऱ्यांत सांपडून आडखळतो आणि पाहूं गेल्यास तप, इंद्रियनिरोध इत्यादिकांत आपल्या हातून घडणारे दोष व चुक्या आड येतात, इतकेंच नव्हे, तर आपले जुने ग्रंथ वाचले असतां योग्यांस योगसाधनाचे वेळीं विघ्न करण्यासाठीं इंद्रादि देवतासुद्धां अप्सरादि पाठवितात व त्यामुळें ते योगभ्रष्ट होण्याचा संभव बराच असतो, असें तेथें आढळतें. परंतु भक्तिमार्गाची गोष्ट तशी नाहीं व त्या मार्गानें

हरिभजनी धांवतां भावबळें । पडेना आडखुळे सप्रेमयोगें ॥

असें सांगून एकनाथमहाराज प्रेम म्हणून जो त्याचा विशेष गुण त्याचें गौरव करितात.

आपण योगमार्गाचा विचार केला, तर त्यांत कठोरपणाचें प्राधान्य आहे. असें दृष्टोत्पत्तीस येईल. घोर तप काय, किंवा इंद्रियें निर्विषय करून टाकण्याचा प्रयत्न काय, सर्वत्र कोमलता, सदयता वगैरे ज्या अंतःकरणाच्या चांगल्या वृत्ति त्यांचा विकास होण्याऐवजी त्या नाहींतशा करण्याकडेच त्यांचें धोरण असतें. शांडिल्यांनीं भक्ति म्हणजे ' आत्यंतिकासक्तिः ' अशी व्याख्या केली आहे; तिजवरूनही कोमलता, सदयता, मार्दव वगैरे सद्वृत्ति भक्तीमध्यें आहेत, असें सिद्ध होतें, प्रीति ( परमेश्वरावर व मानवबंधूवर ) हेंच भक्तीचें मुख्य लक्षण, हाच तिचा मुख्य अधिकार आहे. योग, ज्ञान व कर्म या तिन्हीं मार्गांमध्यें प्रीतीचा अभाव असतो. गोसावी, बैरागी वगैरे योगमार्गाचें अनुयायी पाहिले, तर त्यांच्या अंगी प्रीतिचा कांहींच भाग दिसत नाहीं; जी स्वतःविषयीं निष्ठुर व बेपर्वा असतो, तो दुसऱ्यांशीं कृपाळु कसा होईल? ज्ञानमार्गांतही प्रेमाचा भाग नसतो. मनुष्याच्या मनामध्यें जी कोमलता अथवा मधुरता असते, जिच्या योगानें त्यास प्रसन्नता, समाधान व संतोष हीं प्राप्त होतात; तिचा संबंध ज्ञानमार्गाशीं मुळींच नाहीं. उलट ह्यांत अभिमानाची वृद्धि असते. पूर्वीची एक एक गोष्ट ऐकिली, तर या अभिमानाचें प्रस्थ अतिशय वाढलेलें दिसतें. काशीस जाऊन अध्ययन पुरें झालें, म्हणजे आपलें पांडित्य मिरविण्यासाठीं यज्ञोपवितास एक वस्तरा बांधून शहरोशहरीं फिरावयाचें; व ज्या कोणास आपणाशीं वाद करावयास सामर्थ्य असेल त्यानें पुढें यावें; तो जिंकला गेला, तर त्यानें आपणांस अजिंक्यपत्र द्यावें व आपण हरल्यास जिव्हा वस्तऱ्यानें कापून टाकावयाची, अशी कठीण प्रतिज्ञा करण्याची चाल होती. अशा प्रकारचा अभिमान आपल्या लोकांतच असतो, व इंग्रजी, फारसी, मुसलमानी वगैरे विद्येत व शास्त्रांत प्रवीण झालेल्या पंडितांत नसतो असें नाहीं. त्यांच्यामध्येंहि आपापल्या मतांविषयीं अभिमान व दुसरें सर्व पक्ष खोटे, आपला खरा, असें समर्थन करण्याविषयीं बराच आग्रह दिसण्यांत येतो. कारण, एकंदर ज्ञानमार्गाची गतच तशी आहे. आग्रह, म्हणजे ओढून घेणें, व प्रेम, म्हणजे सोडून देणें, पाझरणें; अर्थात् जेथें आग्रह असेल तेथें प्रेमाला स्थान नाहीं. यावरून असें होतें कीं, ज्ञानमार्गाचा योग म्हणजे अधिकार अथवा साधन, प्रेमरहित आहे. ज्ञानमार्गास परमेश्वरप्राप्ति होत असेल, परंतु साधारण अनुभव असा आहे कीं, त्यांस अभिमानांधतेमुळें दुसऱ्याविषयीं यत्किंचित् कळकळ नसते.

कर्ममार्गाचाहि प्रकार असाच. जशी योगमार्गांत निष्ठुरता, कठोरपणा अधिक व ज्ञानमार्गांत अभिमान प्रबल; तशीच कर्ममार्गांत जडता विशेष असते. कर्ममार्गांत मनुष्य एकदां गढून गेला म्हणजे सारा जन्म त्यांतच गुंतून असतो. या जडतेची मजल एथपर्यंत ठेपली आहे कीं, मागें वर्षवर्षपर्यंत एक यज्ञ चालत असे. इतकी कर्माशीं एकरूपता व मनाची जडता झाली म्हणजे त्यापासून फायदा काय? कारण, जडता व प्रेम हीं एके ठिकाणीं नांदत नाहींत. आपण चैतन्यस्वरूपी असतो

जडतेच्या आधीन झालों, तर आपण प्रेमरहित होतों हाच काय तो संस्कार होतो. वीरवैष्णवादिकांचा जडतेचा प्रकार असाच असतो. एकजण एकादशीच्या दिवशीं निराहार राहतो; इतकेंच नाहीं, तर पोटांत पाण्याचा थेंबही जाऊं देत नाहीं. दुसरा कडक शैव असला, तर त्या दिवशीं हटकून निदान दोनदां जेवतो! एक कपाळभर आडवें भस्म व गंध लावितो; तर दुसरा नाकाच्या मध्यापासून तों शेंडीपर्यंत उभी रेघ कोरितो! या सर्व कृतींत जडतेचें अधिक्य असून प्रेमाचा अंश फारच थोडा असतो. या मार्गास अनुसरणारे कोणी महात्मे प्रेमयुक्त वत्सल असतील, नाहींच असें म्हणणें योग्य नाहीं; परंतु साधारण भाग जडतेचा ह्यांत संशय नाहीं. भक्तिमार्गाचा विचार केला, तर त्यांत मात्र मुख्य योग अथवा साधन व अधिकार कशाचा, तर प्रेमाचा. त्याच्या पुढें सर्व गौण. म्हणूनच एकनाथमहाराजांनीं म्हटलें आहे:—

> ऐसे आचरितां भागवतधर्म । बाधूं न शके कदा कर्म ॥
>
> कर्मासि ज्याची आज्ञा नेम । तो पुरुषोत्तम भजनामाजी ॥ १ ॥

व या मार्गाचें गौरव केलें आहे.

परमेश्वर प्रेमस्वरूप व प्रेमाचें अधिष्ठान असल्यामुळें व त्यानें आपल्या अंतःकरणात तें ठेविल्यामुळें ज्या मार्गाचा मुख्य अधिकार व साधन प्रेम तोच सुगम व त्याकडेस आपली प्रवृत्ति होणें साहजिक होय. कर्ममार्गानें जडतेचे पर्वत मध्यें आड येतात. ज्ञानमार्गानें अभिमान आड येतो, योगमार्गाचा कडकपणा व निष्ठुरता या मोठ्या अडचणी आहेत; परंतु भक्तिमार्गांत तशी कांहींच आडकाठी नाहीं.

परमेश्वरापाशीं जावयाचें असलें म्हणजे राजवाड्यांत प्रवेश करूं इच्छिणारास जशा चौक्या लागतात तशा तीन चौक्या लागतात. पहिली निर्दय आरब पहारेकऱ्यांसारख्या योगमार्ग्यांची. तेथें गेलें म्हणजे चौकीदार विचारूं लागतात. 'तुम्ही इकडे कशाला आला? तुम्हीं तप वगैरे करून अधिकार मिळविला आहे काय? नसेल तर तें करा, नंतर इकडे या.' यांस चुकवून एकदां कसेंही करून, पुढें मजल मारिली, तों दुसरी चौकी मुत्सद्यांसारख्या ज्ञानमार्ग्यांची लागते. तेथें प्राप्त झालें असतां 'तुम्ही काय वैद्य आहां; कीं पंडित आहां, किंवा कवि आहां?' अशी चौकीदारांकडून विचारपूस होते. तेथून सायासानें सुटून पुढें गमन केलें तों तिसरी, दरबारांत कसें जावें, कसें चालावें वगैरे सूचना देणाऱ्या कर्ममार्ग्यांची चौकी लागते; तेथें महाराजांच्या भेटीस जावयाचें, तर कांहीं तरी नजराणा न्यावा लागतो. 'रिक्तहस्त आलां, कीं कांहीं भेट घेऊन आलां' वगैरे तपास तेथें होतो. या तीन चौक्या ओलांडून ज्याचें दर्शन व्हावें या उद्देशानें सर्व खटपट होते तो आंत असलेला राजा पाहावा, तर त्याच्याठायीं क्रूरता नाहीं, अभिमान नाहीं; व निष्कळ प्रेमाखेरीज दुसऱ्या नजराण्याची अपेक्षा नाहीं, असा तो असतो. या भक्तिमार्गाचा

अथवा प्रेममार्गांचा दरबार असा असतो कीं, तेथें आरब पहारेकरी नाहींत, पंडित मुत्सद्दी वगैरे ह्यांचा अटकाव नाहीं, तेथें नाण्यांचा नजराणा, किंवा फळेंफुलें कांहीं नकोत, फक्त प्रेमयुक्त भावाच्या द्वारें देवाचें दर्शन होतें. तो देव कसा आहे तें तुकारामबावांनीं पुढील अभंगांत उत्तम रीतीनें सांगितलें आहे—

जो भक्तांचा विसांवा । उभा पाचारितो धांवा ॥
हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ॥ १ ॥

भक्तांनीं खटपट करून यावें; मग आपण भेट देऊं, म्हणून तो वाट पहात नाहीं. तर उलट उभा राहून हांका मारितो व तुमच्यावर माझें प्रेम आहे व म्हांमध्यें प्रेम ठेविलेंच आहे व तें वाढेल असें मी करीन; मात्र तुम्ही मला ओळखा असें सांगतो.

सर्व मार्गांचें अनुसंधान कोणीकडे, त्यांपासून साध्य काय, हें पाहूं गेल्यास पापापासून मुक्तता व भगवत्प्राप्ति व्हावी हेंच. होमहवनें, जपतप, स्नानसंध्या या सर्वांच्या आधीं जो संकल्प असतो व अंतीं जें अर्पण असतें त्यांचा उद्देश काय असतो ? तर जन्मजन्मांतरीं झालेल्या पापांचें क्षालन व्हावें व आपण जें कांहीं कर्म करितों तें परमेश्वरास अर्पण व्हावें, असाच असतो. फरक इतकाच कीं, योगमार्ग, ज्ञानमार्ग व कर्ममार्ग या तिहींमध्यें सायास, त्रास, धोके व अडचणी भरपूर असून त्यांनीं निष्ठुरता, अभिमान व जडता अनुक्रमें वाढण्याचा बराच संभव असतो, व भक्तिमार्गांत खटपट, त्रास मुळींच नसून फक्त प्रेमळ भावानें सर्व कार्यभाग होतो. या दरबारांतला राजा उठून आपण होऊन भक्ताच्या दारीं चालत येतो म्हणून.

श्रुतिस्मृति दोनी डोळे । तेणेंविण जे आंधळे ॥


असे जे तुम्हांआम्हांसारखे साळेभोळे त्यांस सुलभ असा हा भजनमार्ग दाखवून त्याचें एकनाथमहाराजांनीं गौरव केलें आहे.

या भक्तिमार्गाची विशेष थोरवी यांत आहे कीं, ह्यांत जातिभेद, स्त्रीपुरुषादि भेद यांस जागा नाहीं व आवडनिवड नाहीं. माळी, कोळी, सोनार, कुंभार, चांभार, महार या सर्वांचीं संतमालिकेत गणना आहे; तिजमधून मुसलमानसुद्धां वगळलेले नाहींत. भजनाच्या प्रारंभीं साधूंस नमन करण्याची चाल आहे, त्या वेळीं ज्ञानदेव एकनाथ, तुकाराम वगैरे साधूंस नमनें झाल्यावर कबीर व शेखमहंमद यांसही नमन करतात. संतमालिकेंत गोरा कुंभार व चोखामेळा महार यांचा समावेश आहे. मुक्ताबाई, मिराबाई व कान्होपात्रा या स्त्रिया तिजमध्यें आहेत. अर्थात वर्णाश्रमधर्माचीं या मार्गाला आडकाठी नाहीं, तो सर्वांस सारखा मोकळा आहे. शिवाय भक्तिमार्गाचें मुख्य साधन अथवा अधिकार, मनुष्यमात्रास साधारण जें प्रेम तें असल्यामुळें तो अधिक सुगम आहे.

रामोशी, भिल्ल वगैरे दरोडखोर क्रूर लोक दुबळ्यांचा अत्यंत निष्ठुरपणें खून करून द्रव्य हरण करतात; तरी त्यांच्या अंतःकरणांत आपल्या पोरांबाळांविषयीं

ममता असते. व त्यांच्या उदरंभरणार्थ तें निंद्य व घोर कर्में करितात. यावरून सर्वांच्या ठिकाणीं प्रेम असतें व सर्वांस याची गरजही असते, हें उघड आहे. प्रेमाची गरज कोणास नाहीं असें होणार नाहीं. या सुलभ भक्तिमार्गानें, अथवा प्रेममार्गानें, परमेश्वर जो प्रेमस्वरूप आहे व ज्याला प्रेमासारखी कशाची आवड नाहीं, तो उठून चालत घरीं येतो. योग्यांच्या घोर तपश्चर्येनंतर समाधिदृष्टीनें दिसणारा, किंवा ज्ञान्यांच्या सर्व प्रकारच्या शंका दूर झाल्यावर, भेटणारा, किंवा कर्ममार्ग्यांच्या शेंकडों योगहवनांनीं अथवा व्रतवैकल्यांनीं प्राप्त होणारा ईश्वर आपणांस नको व तो प्राप्त होण्यास आवश्यक जे आयास ते आपल्यास होणार नाहींत. फार खटपट व तो प्राप्त केल्याशिवाय प्राप्य असा ईश्वर आपणांस हवा. वेदशास्त्रांचा परमेश्वर दूर व दुःसाध्य. आपणांस संतचरित्रांतला, सन्निध असणारा व हांक मारतांच येणारा ईश्वर पाहिजे. पोटांत कळ येतांच आपण जसें 'आई आई' म्हणतों व ती वत्सल माता धांवून येते, तसें 'राम राम' 'देवा देवा' म्हणतांच कनवाळूपणानें येणारा देव पाहिजे. देवानें भक्ताचें घोडे धुतले, सारथ्य केलें, त्याच्या यज्ञांत उष्टया पत्रावळी काढल्या वगैरे ज्या पुराणांतील कथा आहेत त्या वाचून अथवा ऐकून देवास हलकेपणा आणण्याचा कवींचा उद्देश होता अशी कुकल्पना मनांत न आणितां तो केवळ कविलाघवाचा प्रकार असेंच मानणें चांगलें. व या गोष्टी ईश्वर भक्तांसाठीं स्वतः करण्याऐवजीं दुसऱ्याकडून करवितो असें म्हटल्यानें कांहीं कमी होत नाहीं. आपणांस जागृत व नेहमीं भक्तांच्या धांव्यांत उभा असा देव पाहिजे. या अफाट सृष्टिरूपी घड्याळास एक वेळ किल्ली देऊन निद्रित झालेला असा अलीकडलि ज्ञान्यांचा परमेश्वर आम्हांस नको; तर प्रसंग असेल त्याप्रमाणें वरचेवर किल्ली देणारा व भक्तांच्या सहाय्यार्थ उभा असल्याची साक्ष देणारा देव पाहिजे.

(न्या. रानडे यांचें एक व्याख्यान)



# मानवी जीवनाची महती

## त्याची आपण काळजी घ्यावी.

मनुष्यमात्राला आयुष्यांत आपल्याला नेहमीं सुख प्राप्त व्हावें असें वाटत असतें. हें वाटणें सहाजिकच आहे; कारण दुःख कोणालाहि नको असतें. पण मानवी जीवनाचा थोडा तरी विचार करणारे जे असतात त्यांना ठाऊक असतें, कीं आयुष्यांत सदोदीत सुखप्राप्ति होणें अशक्य आहे. किंबहुना अस्वाभाविक आहे. तरी पण तेहि सुख, समाधान व शांति ह्यांचा अनुभव घेत घेत आपल्या जन्माचें सार्थक व्हावें अशी अपेक्षा करितात. जन्माचें सार्थक, सुफलित जीवन, इत्यादि शब्दयोजना आपण नेहमीं करतों व इतरांनीं केलेली पहातों. पण जन्माचें सार्थक म्हणजे काय, तें होण्याला आपलें ध्येय काय असलें पाहिजे व त्या ध्येयाच्या पूर्तीसाठीं कोणत्या उपायांचें किंवा साधनांचें अवलंबन केलें पाहिजे, ह्याविषयीं आपणापैकीं फारच थोड्यांना स्पष्ट कल्पना असते. बहुजन समाजाचा फारच मोठा भाग, सुकाणुं नसलेल्या व डोलकाठ्या मोडलेल्या जहाजाप्रमाणें भवसागरांतून हेलकावे खात फिरत असतो. ध्येय ठेवून त्याप्रमाणें वागणें हें फक्त मनुष्यालाच शक्य आहे, इतर प्राण्यांना नाहीं. कारण फार दूरवरचा विचार मनुष्यांनाच करतां येतो, आपलें ध्येय ज्या मानानें उच्च असेल त्याच मानानें ध्येय गांठण्यासाठीं योजले जाणारे उपाय श्रेष्ठ दर्जाचे असतील. ह्यासाठीं आपल्या हातून गोष्टी होऊं नयेत, पापाचरण होऊं नये म्हणून प्रत्येकानें श्रेष्ठतम ध्येय आपल्यापुढें ठेवावें. तें तसें ठेवतां यावें म्हणून ज्या अनेक गोष्टींची जागृति आमच्या ठिकाणीं असली पाहिजे, त्यापैकीं **मानवी जीवनाची** महति ही एक होय.

जीव, मग तो अत्यंत क्षुद्र माणसाचा कां असेना, फार महत्वाचा आहे. आपण कीडीमुंगीसारख्यांचे जीव घेण्याला कचरतों. कारण परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या प्राण्यांचा आपल्या हातून नाश होऊं नये. आम्हीं ' अहिंसा परमोधर्मः ' हें तत्त्व मान्य करतों. क्षुद्र प्राण्यांच्या जीवाची जर एवढी महति, तर मानवी जीवनाची किती मोठी असली पाहिजे ! आम्ही परमेश्वरापाशीं हें जीवन मागितलेलें नाहीं. त्यानेंहि आम्हांला पाहिजे का म्हणून विचारलें नाहीं. त्यानें आपण होऊन तें आम्हांला दिलें व तें दिल्यामुळें आम्हांवर येणाऱ्या जबाबदारींतून मुक्त होतां यावें म्हणून त्यानें आम्हांला साधनसामग्री दिली. त्या सर्वांचा उपयोग करून आम्हीं जन्माचें सार्थक करावें. ह्या जीवनाचे साधारणपणें चार भाग करतां येतात. पहिला शैशव व बाळपण, दुसरा तारुण्य तिसरा मध्यमवय, चौथा वृद्धापकाळ. हे चारहि भाग फार महत्वाचे असून ध्येयप्राप्ति

पोषक आहेत. बालपण खेळांत जातें असा सर्वसाधारण समज असतो. परंतु तो सर्वस्वी खरा नाहीं. त्या वेळीं आम्हीं बोलायला, चालायला, अनुकरण करण्याला, सुख देण्याला व घेण्याला शिकतों. शाळेंत जातों व ज्ञानप्राप्ती करून घेतों. सहानुभूतीची वाढ करतों, स्नेह जोडतों, प्रेम करण्यास शिकतों, समतेचें तत्त्व नकळत कां होईना पण प्रत्यक्ष आचरण्यास लागतों. पुढें तरुणपणीं आम्हीं आपला व जगाचा संसार करूं लागतों. त्या वेळीं नवा दम असल्यामुळें उत्साह असतो. देशसेवा, समाजसेवा करूं, मानमरातब मिळवूं, पैसा मिळवूं, इत्यादि आकांक्षा असतात. ही वेळ सुखोपभोगाची असते. त्यामुळें दुर्मदाला ऊत येण्याचा संभव असतो. परंतु ध्येय दृष्टीपुढें ठेवून तें सतत अनुसरण्याचा प्रयत्न केला असतां वासनालहरींमध्यें बुडून न जातां सदाकांक्षा तृप्त करणें शक्य असतें. मध्यम वयांत हीच स्थिती चालू असते. वृद्धपणीं शारीरिक दुःखें होतात, गात्रें शिथिल होतात, बल नाहींसें होतें; उत्साह नष्ट होतो; परंतु ह्या काळींहि जीवन नकोसें होत नाहीं. इतरांच्या विशेषतः—लहानांच्याच तरुणांच्या प्रेमानें सुख होतें. त्यांचे आपण मार्गदर्शक म्हणून आनंद होतो.

ह्याप्रमाणें हे चारहि जीवनाचे भाग सुखावह असतात. केव्हां केव्हां दुःखाचा चटका फार तीव्र असला तर जग दुःखमय आहे असा भास होतो व आपल्या मनावर निराशेचा पगडा बसतो. परंतु अधिक विचार केला असतां निराशेला या जगांत जागाच नाहीं अशी खात्री होते. इतकें श्रेष्ठ मानवी जीवन असून आपण तें कसें चालवतों हें पाहिलें म्हणजे मात्र चमत्कारिक स्थिति दिसते. त्याची आम्हीं घ्यावी तितकी काळजी घेत नाहीं, इतकेंच नव्हे तर ती घेणें हें आपलें कर्तव्यच नव्हे अशा तऱ्हेचे वर्तन करतो. चित्रकार आपल्या चित्राची मूर्तिकार आपण करावयाला घेतलेल्या मूर्तीची, कवी आपल्या काव्याची किंबहुना आपण आपल्या रहाण्याच्या घराची बसावयाच्या गाडीघोड्याची, अंगांत घालावयाच्या कोटाची जितकी काळजी वहातों, तितकीहि ज्यावर आपली उन्नति अवलंबून आहे त्या मानवजीवनाची काळजी घेत नाहीं हे आश्चर्यकारक नव्हे काय? कोणाला ह्याचें कारण विचारलें तर वेळाचा अभाव, जीवनकलहाची तीव्रता, आपला दुबळेपणा इत्यादि क्षुद्र सबबी पुढें ढकलण्यांत येतात! पण ह्या सबबी पुढें करून काय होणार आहे? जीवन सार्थक करण्यासाठीं दिलेले आहे व तें आपणाला केलेंच पाहिजे. ह्या ठिकाणीं धर्माची आवश्यकता आहे. नरदेहाची अपूर्वता, त्याची महति, पटवून देणाऱ्या व मनुष्याला जीवनाचें सार्थक करण्यास शिकविणाऱ्या धर्माची जरूरी जी असते ती तथेंच. यासाठीं आपण सत्य धर्माची कास धरली पाहिजे.

## तुकोबारायांची श्रद्धा—

# तूं माझा सांगाती

> ' जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ।
> चालविसी हातीं धरोनियां '

हें जें मधुर गीत तुकोबांनीं ईश्वरापाशीं कळवळ्यानें गाइलें, त्यामध्यें खोल अर्थ भरलेला आहे. त्यांनी ईश्वरावरच सर्व भार ठेविला, तो जी वाट दाखवील त्याच वाटेनें जाण्याचें त्यांनीं स्वीकारलें, त्याचीच कास धरली—सच्चिदानंदस्वरूप परमेश्वराकडेच त्यांचा सगळा ओढा लागला, त्यांचें मन परमेश्वराकडून मागें परतण्यास असमर्थ झालें. म्हणून अंतःकरणांतील प्रेम, भक्ति यांच्या प्रकाशांमुळें दिसणारा सत्य मार्ग स्वीकारावा किंवा बाह्य सुखरूप मृगजलामागें धांवावें, याचा आरंभीच विचार केला पाहिजे. कोणत्या मार्गानें जावें याविषयीं मनाचा एकदां निर्धार झाला म्हणजे आम्ही त्या मार्गाकडे ओढल्याप्रमाणें जाऊं लागतों—जणुं काय तो मार्गच आम्हांला खेंचीत असतो. मग ही स्वातंत्र्याची व्यर्थ बडबड कशाला हवी! आज्ञा—क्रिपननें आपल्या दुष्टपणामुळें तिच्या जन्माचें मातेरें केलें, ती त्याच्या दुष्टपणास बळी पडली, पण तो स्वतः अन्य गोष्टीस बळी पडला नाहीं काय? तिसऱ्या रिचर्डसंबंधानें शेक्सपीयरनें जें शोकपर्यवसायी नाटक रचिलें आहे त्यांत एका विशिष्ट प्रकारच्या दुष्ट मनुष्याचें चित्र काढलें आहे, त्याचें क्रिपन हें उदाहरण आहे. रिचर्डला प्रेमाचा अनुभव नव्हता आणि तो मोठा मत्सरी व असूयाशील होता. आपल्याला वाण असलेल्या गोष्टींचा वचपा काढण्याकरितां, इंग्लंडचें राज्यपद मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेच्या आड जे जे कोणी आले त्या सर्वांचा द्वेष करण्याचा व त्यांना इहलोकांतून नाहींसे करण्याचा त्यानें सपाटा लाविला. त्याच्या अंगांत आकर्षक शक्ति, दुर्निवार्य मोहकता इतकी होती कीं, केवळ खून करण्याच्या हौसेस्तव ज्या स्त्रियांच्या पतींचे व मुलांबाळांचे त्यानें क्रूरपणानें खून केले, त्या स्त्रिया त्याला आरंभीं असंख्य शिव्याशाप देत असतांही त्यांनीं त्याच्याशीं अखेरीस लग्नें लाविलीं. तो दुसऱ्यांना आपल्या दुष्टपणास बळी पाडीत होता, परंतु तो स्वतः दुष्ट स्वभावरूप राक्षसास बळी पडला होता. तशीच क्रिपनची अवस्था झाली. तमोगुणरूप राक्षस हा बीजरूपानें प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं असतो. सत्त्वगुणरूप ईश्वरी गुणाचें प्राबल्य होऊं दिलें नाहीं, म्हणजे या सैतानाला चांगलें फावतें. विषयसुखाच्या मागें लागणारा, नीच वासनांच्या आधीन होणारा मनुष्य हा लहान प्रमाणावर एक क्रिपनच होय. असा मनुष्य संसारांतील मोहास बळी पडतो, क्षणिक सुखाचा गुलाम बनतो,

आणि पशुतुल्य वर्तन करितो. स्वातंत्र्य, स्वातंत्र्य असें आम्ही म्हणतों; परंतु वस्तुतः कोणीच स्वतंत्र नाहीं, हें आमच्या लक्षांत येत नाहीं. आपण सर्व आज्ञापालनाच्या धर्मबंधनानें बद्ध झालेले आहों. आपल्या अंतरीं अशी कांहीं एक शक्ति आहे कीं, ती आपणांकडून धारकता हा आमचा धर्म आहे, सन्मार्ग किंवा दुर्मार्ग आम्हांला आकर्षित असतो, व निमुटपणें आम्ही त्याला अनुसरत असतों. एक आधुनिक पाश्चात्य साधु जेम्स मार्टिनो यांनीं ईश्वराच्या आज्ञेस अनुसरण्याचा उपदेश केला आहे. ते म्हणतात, ' गडेहो, आज्ञापरिपालनाचें महत्त्व फार आहे. त्याची पवित्रता थोर आहे. मनुष्यत्वास अत्युन्नत पदवीला नेऊन, न डगमगतां व आनंदानें, पवित्र अशा अंतःप्रेरणेला जो अनुसरत नाहीं त्याच्या ठिकाणीं भक्तीचा व प्रेमाचा कांहींच ओलावा नाहीं त्याचा प्रेमाचा झरा आटलाच, म्हणून समजावें; आणखी असें कीं, हा असा मनुष्य स्वतंत्र होण्याकरितां धडपड करीत असतो खरा, परंतु त्या धडपडण्यानें त्याचीं बंधनें मात्र अधिकच दृढ होत असतात. '

तुकोबा म्हणतात त्याप्रमाणें जेथें तेथें परमेश्वराची सोबत असली पाहिजे व तो हातास धरून नेईल तिकडे गेलें पाहिजे. ' तदुपासते ' म्हणजे तो ( परमेश्वर ) आमच्याजवळ आहे असें उपनिषदांत म्हटलें आहे. " परमेश्वराचें राज्य आमच्या अंतःकरणांत आहे." ( The Kingdom of God is within us ) असें येशू ख्रिस्ताचें वाक्य आहे. असा सर्वसमर्थ मार्गदर्शक असतांना आणि आम्हांला कोणत्यातरी मार्गास अनुसरणें भाग असतांना, दुसरा मार्गदर्शक आम्हीं कां पहावा ? दुसऱ्याला आम्हीं कां अनुसरावें ? मात्र, जोंपर्यंत आम्हीं असुरांचा आश्रय केला असेल, आसुरी–बुद्धीच्या–तमोगुणाच्या–विषयाधीनतेच्या वाटेनें आम्हीं जात असूं, खाऊनपिऊन चैन करणें हीच जीविताची इतिकर्तव्यता आहे, असें आम्हांला वाटत असेल, तोंपर्यंत ईश्वर आम्हांला हातीं धरून चालविणार नाहीं. इंग्रजींत एक वचन आहे – " When half gods go, God arrives." अधम मनोवृत्ति, विषयवासना म्हणजेच half gods होय. या असुरांनां सोडून ईश्वराला आम्ही भजूं लागलों म्हणजे तुकोबा म्हणतात त्याप्रमाणें, तो ईश्वरच आमचा 'भार चालवितो', ' अवघे जन सोइरे प्राणसखे ' होतात आणि ' अंतर्बाह्य सुखा ' ची प्राप्ति होते. हें अंतरबाह्य सुख, ही शांति बुद्धिगम्य नाहीं. हिचा अनुभवच घेतला पाहिजे. हाच मोक्ष, हेंच निर्वाण.


सारांश, ईश्वर जिकडे नेईल तिकडे जावें, त्याची कास धरावी, त्याच्यावर सर्व भार टाकावा, म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल; परंतु या बाबतींत असा प्रश्न निघतो कीं, आम्हांस जर ईश्वराला मार्गदर्शक करितां येतें, त्याला आमचा सोबती करितां येतो तर अर्थातच त्याचें ज्ञान होणेंहि शक्य आहे. ज्याच्यावर सर्व भार टाकावयाचा त्याचें ज्ञान होणें अवश्य नाहीं काय ? तो कोण, कोठें असतो, वगैरे समजल्याशिवाय त्याच्यावर आम्हीं विश्वास कसा

ठेवावयाचा ! पण तुकारामबुवाच म्हणतात, “ वेदाचिये मती नाकळसी देवा । तेथें माझा केवा कोणीकडे ॥ ” उपनिषदांतही “ यस्यामतं तस्य मतम् ” असेंच म्हटलें आहे; म्हणजे ज्याला ईश्वराचें ज्ञान आपल्यास झालें असें वाटतें त्याला तें ज्ञान झालें नाहीं, असें उपनिषदाचें म्हणणें आहे. मनुष्य किती झाला तरी मर्यादित पडला; परंतु ईश्वर अमर्यादित आहे. आम्हीं काय आहों ? शरीर, बुद्धि व आत्मा. शरीर, बुद्धि व आत्मा. शरीर विनाशी आहे. भस्मांतं शरीरम् हें वचन सुप्रसिद्धच आहे. शरीरापेक्षां बुद्धि थोर खरी, परंतु मनुष्याच्या बुद्धीचा भाव तो कोठवर ? मनुष्याची बुद्धि अंधकारांत चांचपडत असते. जगाच्या उत्पत्तीपासून गुरुत्वाकर्षणाचा नियम अस्तित्वांत होता.; तीच गोष्ट रुधिराभिसरणाची. परंतु मनुष्याच्या बुद्धीस या गोष्टींचा शोध लागेपर्यंत कैक शतकें लोटलीं. चिलटांपासून मलेरियाचे हिंवतापाची उत्पत्ति होते हा शोध कैक शतकानंतर हल्लीं लागला आहे. इतका काळ आम्ही अंधारांत चांचपडत होतों, आणि चिलटांपासून माणसाचा फडशा उडत होता. नवीन नवीन शोध अर्वाचीन काळीं लागत आहेत खरे, तथापि जगामध्यें नवीन नवीन अनिष्ट गोष्टींचीही भर पडत आहे. काय हें मनुष्याचें अज्ञान ! बरें त्याच्या आत्म्याची वाट काय ? आत्मा—म्हणजे काय ? हेंहि अज्ञेयच—तो बिचारा सारखा तळतळत आहे, धडपडत आहे, निराशेचे सुस्कारे टाकीत आहे. ‘ या विश्वाचा जो गूढ चमत्कार आहे, त्याच्यापुढें मी कःपदार्थ ! ’ असें मानवी आत्म्याला वाटत आहे.

परंतु मनुष्याची जी ही लघुता, निरहंकारिता, तीच त्याची थोरवी होय. तिच्यामुळेंच ईश्वराच्या सोबतीस, त्याच्या मार्गदर्शित्वास व त्यानें दाखविलेल्या दिशेनें जाण्यास मनुष्य पात्र होतो. ईश्वराचें—परमात्म्याचें वर्णन करितांना ‘ वायुरनिलममृतम् ’ असें


दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.),

म्हटलें आहे. मनुष्यही—मानवी आत्माही—तसाच आहे. भक्ति करण्याकरितां, प्रेम करण्याकरितां, उच्च आकांक्षांनीं प्रेरित होण्याकरितां मनुष्याचा जन्म आहे. मनुष्यानें आपल्या सोबतीची इच्छा करावी. अशी परमेश्वराची इच्छा आहे. 'स्वतःची लघुता ओळखणें हेंच एक मोठेपणाचें कृत्य आहे. आपण कांहींच नाहीं, असें एखाद्याला वाटणें हाच मोठेपणास शोभणारा विचार होय.' असें मार्टिनो यांनीं म्हटलें आहे. यस्यामतं तस्य मतम् याचा अर्थ हाच. प्रेम करणें, दुःख सोसणें, निराश होणें, उमेद बाळगणें, वर चढणें व खालीं पडणें, खालीं पडल्यावर उठून पुन्हा वर जाण्याची इच्छा करणें आणि पुढें पुढें जाणें हाच मनुष्याचा मोठेपणा होय. दुःख, कष्ट, धडपड, हीं अनिष्टें दिसतात, अंधकारमय वाटतात, तथापि त्यांतच आमचा मोठेपणा असतो, त्यांच्यामुळेंच ज्ञानाचा प्रकाश पडतो, उच्च कल्पना प्रादुर्भूत होतात. खाऊनपिऊन चैन करणें, निरनिराळ्या विषयसुखांचा उपभोग घेणें हा नव्हे, तर लहान मुलाप्रमाणें काळोखांत धडपडणें, शोधतां शोधतां घामाघूम होणें, अडखळणें, पडणें, आणि पडल्यावर बिलकूल निरुत्साह न होतां वर उठणें, हाच मनुष्यांचा निसर्गसिद्ध हक्क आहे. आळशी, चैनी, ऐषआरामी, संपत्तींत लोळणाऱ्या व मोठ्या वैभवांत विराजमान होणाऱ्या लोकांचें आम्हीं कौतुक करितों, कीं मेहनत करणाऱ्या, झटून काम करीत असतां धक्के टोणपे खाणाऱ्या आणि तशा स्थितींतही ईश्वरावर भरंवसा ठेवून मुकाट्यानें काम करणाऱ्या माणसांचें आम्हीं कौतुक करितों ? या दुसऱ्या माणसांचीच जगांत आजपर्यंत प्रशंसा झाली आहे. अशींच माणसें मनुष्यजन्माचें सार्थक्य करितात, मनुष्यास देवकळा आणितात. तुम्ही म्हणत असाल कीं, मनुष्य-जन्म म्हणजे एक शोकपर्यवसायी नाटक आहे. होय; तसेंच कां म्हणाना ? शोकपर्यवसायीच नाटक होऊं द्या. आनंदपर्यवसायी नाटकाची गोष्ट सोडून द्या. हा आपला मनुष्यजन्मच दुःखांनीं भरलेला आहे. यांत पदोपदीं धडपड चाललेली आहे, अश्रूंचे पाट वाहत आहेत म्हणूनच तो इष्ट आहे, असें समजा. जी दुःखें दिसतात, तीं दुःखें नाहींत, तर तो एक प्रकारचा आनंदच आहे. संसारांतील धडपड त्रासकारक वाटते खरी, परंतु ज्यावेळीं कळ पोंचते, वेदना होतात, तेव्हां सहनशीलतेचा धडा आम्ही शिकत असतों, दुःखानें दीर्घ विश्वास टाकतों, तेव्हां आत्म्याला उन्नतीचा मार्ग दिसत असतो, देवाच्या संगतीची अपेक्षा वाटत असते. ईश्वरावर भरंवसा ठेवून संसारांतील मनुष्य-जन्मांतील कष्टांचीं कामें करा, दुःख सोसा.

"तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हांसी ॥"

मनुष्यप्राणी क्षुद्र आहे, दुर्बल आहे, असें म्हणतांना त्या क्षुद्रपणांतच त्याची महति आहे, हें विसरूं नका. श्रद्धा ठेवणें, प्रेम करणें, उच्च सात्विक आकांक्षा बाळगणें आणि दुःखपरंपरा सहन करणें, हीं ईश्वराचें सान्निध्य-संगति संपादण्याची शिफारसपत्रें आहेत. परद्वेष व स्वसुखाभिलाष यांना मार्ग तेथें जाऊं शकत नाहीं. केव्हां तरी

मनुष्याला एकदां अशी वेळ येतेच, कीं द्वेषबुद्धि, विषयलोलुपता, आणि परपीडा आदिकरून पापकर्में यांच्याबद्दल प्रायश्चित्त भोगावें लागतें, आणि अशावेळीं पापकर्मांचा पश्चात्ताप झाला असतां त्याची दृष्टि परमेश्वराकडे वळते, ईश्वरी प्रेमाची त्याला तहान लागते, अंतर्बाह्य भरलेल्या परमेश्वराला तो हुडकूं लागतो, परमेश्वराची महति त्याला दिसूं लागते. त्याला समाधान पाहिजे असतें व तें प्राप्त होण्यास परमेश्वरावांचून दुसरा आधार नाहीं, अशी त्याच्या मनाची खात्री पटते. अखेरीस तें समाधान त्याला प्राप्त होतें. कारण प्रेम अमर्याद आहे. प्रेमरूप अमृताच्या सागरामध्यें बुडून मृत्यु येत नाहीं. प्रेमाचा परिणाम झाल्याखेरीज राहत नाहीं, प्रेमाचा कधीं वीट येत नाहीं. मात्र हें प्रेम दैवी पाहिजे—ईश्वरावर जडलें पाहिजे. तर चला आपण सगळे मिळून साधु श्रेष्ठ तुकोबारायाचा अभंग गाऊं:—

**‘ जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ।**
**चालविसी हातीं धरूनियां ॥ ’**

तुकोबा म्हणतात, ‘ देवा, आम्ही जेव्हां हा संसार चालवितों, यांतील निरनिराळे मार्ग चालतों, त्यावेळीं आम्हांला तुझा आश्रय असतो. आमची प्रत्येकाची जी ओझीं ती शिरावर घेऊन चालावयास तूं आम्हांस सामर्थ्य देतोस व बळ देतोस.’ येथें देवाचे धनीपणाचें नातें झालें व पुढें त्याच्या ठिकाणीं मित्रत्वाचें नातें येतें. देव आपला धनी आहे, राजा आहे, राजाधिराज आहे, असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां अर्थात धनी व चाकर, एक अधिकारी व दुसरा तो अधिकार मानणारा, एक नेता व दुसरा तो सांगेल त्याप्रमाणें चालणारा असला संबंध येतो, व त्याची इच्छा आपल्याला प्रमाण असते. पण पुढें हें नातें बदलतें. जसा नोकर आपल्या धन्याची इमानें इतबारें नोकरी करीत असतां कालांतरानें पुढें धनी–चाकराचें नातें कमी होत जाऊन सलगी अधिक वाढत जाते व अंती पूर्वीच्या नात्याच्या ऐवजीं मित्रत्वाचें, विश्वासाचें, प्रेमाचें नातें उद्भवतें, त्याप्रमाणेंच देवाचा व आपला जो संबंध आहे, त्याचें होत असतें. आपण प्रथम देवाची सेवा करितों, नंतर एकनिष्ठ सेवा झाली म्हणजे मित्रत्वाचें व प्रेमाचें नातें उद्भवतें; आणि मग पूर्वी जो धनी होता तोच पूर्वीच्या चाकराचें सहाय्य करितो, त्याची चाकरी करितो ! सकृद्दर्शनीं हा सर्व प्रकार आपल्या दृष्टीस थोडा चमत्कारिक दिसण्याचा संभव आहे. पण, आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, प्रस्तुत अभंग दोन दृष्टींनीं फार हृदयंगम ठरण्यासारखा आहे. कोणाला त्यांत असामान्य काव्यरस ओतप्रोत भरलेला आहे असें वाटेल व त्याच दृष्टीनें त्यास तो फार महत्वाचा वाटेल. इतरांना त्यांत आपल्या सर्व आयुष्याचा विचार करितां अत्यंत लाभदायक असें जें तत्वज्ञान तें त्यांत आहे, असें वाटण्याचा संभव आहे. उत्तम प्रकारची कविता वाचीत असतां जसजशी एकेक ओळ वाचीत जावें, तसतसा अधिकाधिक सरस, हृदयंगम व उदात्त विचारांचा लाभ होत जातो, आणि शेवटली ओळ वाचतांना ज्याप्रमाणें एखादी उंच उंच टेकडी चढून यावें व तेथें आल्यावर तेथील

रम्य देखावा, शीतल वायु यांचा लाभ झाला म्हणजे नवीनच तरतरी येते, थकवा नाहींसा होतो, व आपल्याला जणूं काय एक नवजीवनच प्राप्त झालें आहे, असें वाटतें, त्याप्रमाणें आनंदाचा लाभ होतो व आपल्याला त्या उच्च विचारांची परमावधि जणूं काय अनुभवावयास सांपडून धन्यता वाटते. ज्यानें चांगल्या एखाद्या काव्याचें रहस्य जाणिलें आहे, त्यानें म्हणुन दाखविलें म्हणजे ऐकणारांस फार आनंद होतो. ग्लॅड्स्टन नेहमीं वर्ड्स्वर्थचें काव्य स्वतः वाचीत असे. परंतु, वेस्ट मिन्स्टर पुलावरून प्रातःकाळीं लंडन शहराचा जो देखावा दिसतो, त्यासंबंधाचें त्याचें लहानसें काव्य दुसऱ्यानें म्हटलेलें ऐकून त्याला जो आनंद होत असे, तसा तें स्वतः पुनः वाचून होत नसे. टेनिसनचें मॉड काव्य ब्राइटला, त्यानें तें दुसऱ्यानें म्हटलेलें जेव्हां ऐकिलें तेव्हां, विशेष आवडूं लागलें. तुकारामाचे अभंग मधुरपणें म्हटलेले जेव्हां आपण ऐकतों, तेव्हां ते अमृततुल्य वाटून त्यांचा आपण एकेक घुटका मोठ्या आनंदानें घेत असतों, आणि या अभंगाला तर ही गोष्ट विशेष प्रमाणानें लागू आहे. एका ओळींत उदात्त विचार, नंतर दुसऱ्या ओळींत कांहीं नाहीं, असा येथें प्रकार नाहीं; एकेक ओळ पहिलीहून श्रेष्ठ, दुसऱ्या ओळींतील विचार पहिल्या ओळींतील विचारांपेक्षां अधिक श्रेष्ठ, अधिक हृदयंगम असा अनुभव येतो. देवाचें व आपलें नातें प्रथम धन्याचें असतें, नंतर तो आपला मित्र, सखा होतो, आपला मार्गदर्शक होतो व आपल्यावर अत्यंत प्रेम करूं लागतो, व अखेरीस त्याच्यांत व आपल्यांत सादृश्य येतें, आपण समरस होतों. हें तत्त्वज्ञान ह्या कवितेंत आहे. उत्तम कविता नेहमीं तत्त्वज्ञान-रूपच असते. उत्तम कवीला गुरू, मार्गदर्शक म्हणतात तें ह्याचसाठीं कीं, तो जीवन-रहस्याची आपल्याला ओळख करून देतो व आयुष्यांतील जी उत्तमोत्तम प्रमेयें तीं तो आपल्या आंवाक्यांत आणून देतो.

ह्या अभंगांत तुकोबांनीं जो एक अलंकार साधला आहे तो आपल्या चालण्यावरून घेतला आहे. संसार हा प्रवास करण्याचा प्रदेश कल्पिला आहे. प्रवासही पायीं करावयाचा असून रानावनांतून, ओसाड जागेंतून रखडत जावयाचें, तेव्हां आपलें


उत्कृष्ट कागद आकर्षक रचना

स्वच्छ व सुबक छपाई

# बॉम्बे सेंट्रल प्रेस

मुरलीधर टेंपल कम्पाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं,
जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार-मुंबई २

ठिकाण गांठतां येणार आहे. वाटेंत जातांना पाठीवर नाहीं तर डोक्यावर
आपापलीं ओझीं घ्यावयाचीं, थंडी, वारा, ऊन, पाऊस ह्यांची पर्वा न करितां, कसेही
अडचणीचे रस्ते असले तरी, आपला रस्ता कापीत जावयाचें. आपणही ही
उपमा नेहमीं संसारास देतों. संसाराला आपण संसारयात्रा म्हणतों. पूर्वीच्या काळीं
यात्रा करणें हें मोठें बिकट कार्य गणिलें जात असे. यात्रा करीत असतांना
ज्याप्रमाणें नानाप्रकारचीं संकटें ओढवतात, त्याप्रमाणें संसारयात्रा करितांना होतें,
आणि असें वाटतें कीं, ज्या वेळीं तुकोबाला हा अभंग रचण्याची
स्फूर्ति झाली, त्यावेळीं त्यांच्या दृष्टीपुढें पंढरीचे वारकरी असावेत! त्याकाळीं प्रवास
करणें फार त्रासाचें असे. चांगली सोबत असल्यावांचून प्रवासास निघणें फार धोक्याचें
गणिलें जात असे. पंढरीला जावयाचें म्हणजे मार्गांत अनेक प्रकारचीं संकटें ओढवा-
वयाचीं, हाल–अपेष्टा काढावयास लागत, परंतु त्यांबद्दल भक्तांना कांहींच वाटत नसे.
कारण त्यांस केव्हां एकदां आपल्याला पंढरी गांठतां येईल व विठोबाचें दर्शन होईल,
असें झालेलें असे. त्यामुळें अनेक प्रकारच्या यातना, हाल, अपेष्टा, भूक–तहान, सर्व
कांहीं सहन करावयास ते एका पायावर तयार असत; आणि मग त्यांना देवच आपणाला
पंढरीस नेत आहे, तो आपल्या संगेंही आहे असें वाटत असे. वाटेंत आपलें
रक्षण तोच करीत आहे व आपल्या मंदिराकडे आपल्याला घेऊन जात
आहे, अशा भावनेनें, अशा दृढश्रद्धेनें ते प्रवास करीत. आपण देखील ह्या
पृथ्वीवरील यात्रेकरूच आहोंत. आपण सर्व पुढें पुढें जात आहों, म्हणजे अर्थात्
आपलें जीवन कंठित रहाणें म्हणजे मार्ग चालणें होय, प्रवास करणें होय. आपलें शील
बनण्यास चालण्यासारखा दुसरा तितका गुणकारक उपाय नाहीं, असें मला वाटतें.
तालीम करणें, क्रिकेट, टेनिस, गोल्फ इ० खेळांपासून फायदे आहेत; परंतु ते सर्वांशीं
निर्दोष नव्हत. पण लेस्ली स्टीफन ह्यानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें फिरणें, चालणें
हा व्यायाम शरीर, मन व आत्मा ह्यांस सर्व प्रकारें लाभदायक आहे. वर चित्रविचित्र
रंगांनीं सजलेलें आकाश, वारंवार रंग बदलल्यामुळें ढगांची होणारीं तीं सुंदर चित्रें,
आपल्या भोंवतालीं, आपल्या पायाखालीं हिरव्या चार गवताचा व अनेक रंगाचाहि
पसरलेला रम्य व स्वच्छ गालिचा, मनास आनंदित करणारा व हुरूप आणणारा मंद
वायु यांचा लाभ देत, निरनिराळे देखावे, निरनिराळीं माणसें हीं अवलोकीत आपण
चालत असतों, आणि कोणी मित्र बरोबर नसतांना जर आपण फिरत आलों, तर
आपलें आपल्याशीं, आपल्या आत्म्याशीं किती तरी विषयावर भाषण होत असतें,
आंतून आपल्याला स्फूर्ति मिळत असते व अशाच एकांताच्या, आनंदाच्या व शांत
वेळीं देव आपल्याबरोबर आहे, अता आपल्याला प्रत्यक्ष अनुभव येत असतो.
फिरतांना आपल्यावरोबर जर आपला एखादा मित्र असला, तर संभाषणाच्या द्वारें
आपल्या आनंदात अधिकच भर पडते व मग आपण पुष्कळ मैल चालूं शकतो आणि
अशावेळीं वेळाचें भान रहात नाहीं, किंवा आपल्याला थकल्यासारखेंही वाटत नाहीं.

केवळ व्यायामासाठीं चालणें हेंही फायदेशीर आहे. परंतु त्यापासून आपल्याला विशेष फायदा व्हावा, असें जर आपल्याला वाटत असेल तर कांहींतरी महत्त्वाचें ठिकाण अगर मौजेचें आनंदाचें ठिकाण पहावयास जावें अगर सभोंवारचा सुंदर देखावा पहात पहात चालावें म्हणजे मग मनाला त्याचप्रमाणें शरीरासहि हा असा व्यायाम लाभदायक होतो. हाच अनुभव आपल्याला आयुष्यासंबंधानें येतो. जीवनभर आपण आयुष्य कंठित असतों. लहानाचे मोठे, मोठ्यांचे वृद्ध होतों. हा आपला प्रवासच होय, हा सारखा चालू आहे, कोठें आपल्याला थांबतां येत नाहीं; आणि त्या प्रवासांत आपणाबरोबर जर मित्र असला तर त्याच्या सहवासाच्या योगें आपलें दुःख हलकें होतें. त्रासापासून दगदग फारशी होत नाहीं. आपल्यास एकटेंच बराच प्रवास करावयाचा असला, आणि बरोबर कोणी नसलें, किंवा वर म्हटल्याप्रमाणें चालतांना स्वतःशीच विचार करण्याची संवय नसली, म्हणजे मग चालण्यापासून अतिशय कंटाळा येतो. आपलें हें जीवन कंठणें हें व्यायामासाठीं चालण्यासारखेंच आहे. आयुष्यभर आपण प्रवास करीत असतों व तो करितांना अनेक प्रकारच्या अडचणी, दुःखें, यातना, संकटें, मोहाचे प्रसंग हीं ओझीं आपल्याबरोबर घेऊन मार्ग कंठावयाचा असतो. ज्याप्रमाणें चालतांना आपल्याबरोबर कोणी मित्र असला म्हणजे आपल्याला आनंद होतो, आपलें ओझें जड असलें तर हलकें करावयास त्याचें साहाय्य होतें आणि आपण त्रासलों म्हणजे त्याच्यापासून आपल्याला मदत होते, त्याप्रमाणें हा संसार करीत असतां, हा जीवनरूप प्रवास चालू असतां आपल्याला सुखासमाधानासाठीं, सहाय्यासाठीं, पत्नि, मित्र, पति, पुत्र व मुली, समाज यांची आवश्यकता भासते. परंतु मित्र झाला काय, किंवा पिता पुत्र, पत्नि, बहीण, आप्त, समाज झाला काय, ह्यांचा आपल्याला कांहीं कालपर्यंतच उपयोग व्हावयाचा. हीं सर्व आपल्याबरोबर कांहीं काळपर्यंतच येणें शक्य आहे. खरें पाहतां मनुष्य प्राणी हा एकटाच जन्मास येतो, त्याला एकट्यालाच आपलीं दुःखें सहन करावी लागतात, त्याला स्वतःलाच विचार करून मार्ग शोधावा लागतो, आणि जसा तो एकटाच येतो, तसा अंतींही एकटाच जातो. जेव्हां आपण दिवसाचे सर्व प्रकारचे श्रम करून रात्रीं विश्रांतीसाठीं क्षणभर पडतों व आपल्या एकंदर स्थिती-विषयीं विचार करूं लागतों, त्यावेळीं वर म्हटल्याप्रमाणें अनेक प्रकारचें साहाय्य असलें, तरी आपला मार्ग आपल्यालाच कसा शोधून काढावा लागतो व प्रसंगाच्या वेळीं आपल्यालाच धैर्यानें मार्ग कसा कंठावा लागतो, हें आपणास कळून येतें. पण, अशा वेळींहि खरोखर पाहतां आपण एकटे असतों काय ? मित्र, पिता, पुत्र, पत्नी, आप्त इष्ट इ. इतकेच काय आपले सावली, आपले सांगाती नसतात, त्यांच्याहीपेक्षां श्रेष्ठ असा आपला मित्र आहे. तो आपणापासून कधीं दूर होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर तो आपल्याला जणू काय शोधीत असतो व आपल्याला कानगोष्टी सांगत असतो. आपल्या अंतःकरणाच्या अत्यंत गूढ अशा प्रदेशांत त्याचें वास्तव्य असून

त्याचा मंजुळ ध्वनि आपल्याला नित्य ऐकावयास सांपडतो. यावेळीं येशु ख्रिस्ताच्या अगदीं अखेरच्या एका कृत्याविषयीं आठवण होते. तो प्रथम अगदीं लोकांच्या दाटींत होता. तेथें त्यानें लोकांना उपदेश केला. नंतर आपल्या बाराही शिष्यांस घेऊन तेथून निघाला, आणि एका डोंगराकडे जातांना आपल्याबरोबर त्या बारांतील तीन निवडक शिष्य त्यानें घेतले, व डोंगरावर गेल्यावर त्यास तेथेंच ठेवून आपण परत येई तोंपर्यंत त्यांस देवाचा प्रार्थना करीत रहावयास सांगितलें व आपण स्वतः एका निवांत स्थळीं गेला व तेथें त्यानें देवाची प्रार्थना केली. ह्या प्रसंगावरून आपण जो बोध घ्यावयास पाहिजे, तो असा कीं, आपली खरी वाढ आंतून झाली पाहिजे. ही आंतून वाढ होणें म्हणजेच परमेश्वर आपला सांगाती आहे. याचा अनुभव येणें होय. तो आपल्या बरोबर असतो, तो आपला मार्गदर्शक होतो, मित्र होतो, हा अनुभव आंतून ज्यांची वाढ होते, त्यांस येतो व पदोपदीं त्याचा सहवास त्यांना घडतो. आपण सर्वांनीं आपल्या समाजांत, मित्रांत, लोकसमूहांत मिळून मिसळून राहिलें पाहिजे. त्यांच्या सुखदुःखाचे वांटेकरी झालें पाहिजे. परंतु ज्यावेळीं प्रत्यक्ष परमेश्वर आपला मित्र आहे, सखा आहे, असा आपल्याला अनुभव येतो, तो आपल्या ओझ्यासही हात लावतो, हें आपल्याला पटतें, तेव्हांच ही वरील कामें करण्याचें सामर्थ्य आपल्याला प्राप्त होतें. तुकोबा लोकांत मिळून मिसळून वागले; त्यांनीं कीर्तनें केलीं; देवाचें सारखें भजन केलें; लोकांस उपदेश केले; परंतु भांगार नामक टेकडीवर जाऊन तेथें शांतस्थळीं देवाच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ घेतल्यावांचून, आपलें सगळें हृद्गत देवाला निवेदन केल्यावांचून, त्यांचा एकही दिवस गेला नाहीं. आणि अशा प्रत्यक्ष सहवासानेंच ते संसारांत परत येत, वावरत व त्यावेळीं आपला देव आपल्या संगें आहे, हा त्यांस अनुभव येत असे. अशा प्रकारें आपणही देवाचा सहवास करून घेतला म्हणजे मग आपल्यालाही असा अनुभव येऊं लागतो कीं, आपला देव आपल्यापासून दूर नाहीं, तो अगदीं सन्निध आहे ज्यावेळीं आपण बिकट अशा संकटामध्यें सांपडलेलों असतों, अडचणींत असतों,

*For your Provision Requirements*

*Please Visit*

**GANESH STORES**

**3rd ROAD KHAR WEST.**

*Branch at —*

Khar, Santacruz, (Kalina) Bandra East.

आपल्यावर दुःखाचे प्रसंग आलेले असतात, त्यावेळीं तो आपल्याबरोबर असतो व हे सर्व प्रसंग, संकटें, आपत्ति ह्यांच्या द्वारें आपली उन्नति तो साधीत असतो, असा अनुभव आला म्हणजे मग संसार कष्टमय भासत नाहीं; आपलें कर्तव्य कसेंतरी हातून न होतां, तें उत्तम रीतीनें पार पाडणें हा आपला धर्म आहे, असें वाटून मोठ्या उत्साहानें व अभिमानपूर्वक तें आपण करूं लागतों. देव प्रेमस्वरूप असल्यामुळें सर्वत्र आपल्याला प्रेमाचें राज्य दिसूं लागतें; आणि प्रतिक्षणीं देव आपल्यासंगं आहे व आपण त्याच्या सहवासांत आहों, असा अनुभव येत असल्यामुळें आयुष्यांतील सर्व प्रसंग लाभदायक होतात; सामान्य कार्येंही कंटाळवाणीं न वाटतां उत्साहजनक होतात व हा सर्व परिणाम आपल्या ठिकाणी जी शांति नांदत असते तिचाच होय, हेंही आपल्याला पटतें. परमेश्वराला पूर्णपणें शरण गेल्याच्यायोगें ही अधिकाराची स्थिति प्राप्त होते. म्हणुनच गीतेमध्यें असें अगदीं निक्षून सांगण्यांत आलें आहे कीं,

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥**

"सर्व कर्म म्हणजे साधनें टाकून देऊन मज एकट्यालाच शरण ये. मी सर्व पापांतून तुला मुक्त करीन. तूं याचा कांहीं शोक करूं नको." आपल्या सर्व जीविताचें खरें रहस्य हें आहे. देव आपला सांगाती आहे, याचा अनुभव घ्या; त्याची प्रार्थना करा; आपल्या सर्व गरजा त्यास निवेदन करा; त्याला शरण जा. आणि मग पूर्वी आपल्याला जो हा संसार दुःखमय वाटत होता, तोच संसार नवीन स्वरूप धारण करितो; दुःखें सुखें होतात; नित्याचीं कर्में त्रासदायक न होतां आनंददायक होतात; कारण, ती करीत असतां आपण देवाच्या सहवासांत असतों आणि आपलीं सर्व प्रकारचीं ओझीं देखील आपणांस हलकीं वाटतात; कारण प्रत्यक्ष परमेश्वर परमात्माच तीं सहज सहन करण्याचें सामर्थ्य आपल्याला देत असतो. ज्यांना हें सर्व मान्य आहे, पटलें, ते धन्य होत. ज्यांना अशा प्रकारचा अनुभव स्वतः येत असल्यामुळें हें सर्व पटत आहे, ते त्याहून अधिक धन्य होत. कारण, देव आपल्या सांगाती आहे, तो आपला मित्र आहे, मार्गदर्शक आहे, आपलें ओझें हलकें करणारा आहे, ही गोष्ट तर्कवितर्कांपेक्षां अनुभवानेंच त्वरित पटण्यासारखी आहे. म्हणूनच आपले साधुवर्य तुकोबा कंठरवानें सांगत आहेत कीं,

**घाई अंतरींच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥**
**विधिनिषेध उरफोडी । जंव नाहीं अनुभव गोडी ॥**

——

# मोहावरण दूर करण्यासाठीं गीतेचें प्रयोजन

****************************◆*****************************

—संत विनोबा

गीतेची योजना महाभारतांत केलेली आहे. गीता महाभारताच्या मध्यभागीं सर्व महाभारतावर प्रकाश पाडीत उंच दीपाप्रमाणें उभी आहे. एकीकडे सहा पर्वें दुसरीकडे बारा पर्वें अशा मध्यभागी, तसेंच एकीकडे सात अक्षौहिणी सैन्य, दुसरीकडे अकरा अक्षौहिणी, अशाहि मध्यभागीं गीता उपदशिली जात आहे.

महाभारत व रामायण हे आमचे राष्ट्रीय ग्रंथ आहेत. त्यांतील व्यक्ती आमच्या जीवनाशीं एकरूप झालेल्या आहेत. राम, सीता, धर्म, द्रौपदी, भीष्म, हनुमान, इत्यादि रामायण–महाभारतांतील चरित्रांनीं सर्व भारतीय जीवन आज हजारों वर्षें भारून टाकलें आहे. जगांतील इतर महाकाव्यांतील पात्रें अशीं लोक–जीवनांत मिसळून गेलेली दिसत नाहींत. ह्या दृष्टीनें महाभारत आणि रामायण हे निःसंशय अद्भुत ग्रंथ आहेत. रामायण हें मधुर नीतिकाव्य आहे तर महाभारत हें व्यापक समाजशास्त्र आहे. व्यासांनी एक लक्ष संहिता लिहून असंख्य चित्रें, चरित्रें व चारित्र्यें मोठ्या कौशल्यानें यथावत् रेखाटलीं आहेत. केवळ निर्दोष एका परमेश्वराशिवाय कोणीहि नाहीं; पण तसेंच ह्या जगांत केवळ दोषपूर्ण असेंहि कांहीं नाहीं, ही गोष्ट महाभारत स्पष्टपणें सांगत आहे. भीष्म–युधिष्ठिर अशा सारख्यांचे येथें दोष दाखविले आहेत. उलट कर्ण–दुर्योधनादिकांचेहि गुण प्रगट केले आहेत. मानवी–जीवन हें पांढऱ्या व काळ्या तंतूंचा पट आहे ही गोष्ट महाभारत सांगत आहे. अलिप्त राहून भगवान् व्यास जगांतील विराट् संसाराचें छाया–प्रकाशमय चित्र दाखवीत आहेत. व्यासांच्या ह्या अत्यंत अलिप्त व उदात्त ग्रथन–कौशल्यामुळें महाभारत ग्रंथ म्हणजे एक सोन्याची प्रचंड खाण बनला आहे. शोधन करून भरपूर सोनें लुटून घ्यावें.

एवढें महाभारत व्यासांनीं लिहिलें. पण व्यासांना स्वतःचें असें कांहीं सांगावयाचें होतें की नाहीं? त्यांचा विशिष्ट संदेश त्यांनीं कोठें सांगितला आहे का? कोणत्या ठिकाणीं व्यासांची समाधि लागली आहे? ठिकठिकाणीं अनेक तत्त्वज्ञानांचीं आणि उपदेशांचीं जंगलेंचीं जंगलें महाभारतांत आलीं आहेत. पण ह्या सर्व तत्त्वज्ञानांचें, उपदेशांचें आणि एकंदर ग्रंथाचें सारभूत रहस्य त्यांनीं कोठें मांडलें आहे का? होय. समग्र महाभारताचें नवनीत व्यासांनीं भगवद्गीतेंत दिलें आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण आणि त्यांच्या मननाची संपूर्ण साठवण आहे. हिच्याच आधारें '**मुनींत मुनी मी व्यास**' ही विभूति सार्थ ठरावयाची आहे. प्राचीन काळापासून गीतेला उपनिषद् ही पदवी

मिळाली आहे. गीता उपनिषदांचेंहि उपनिषद आहे. कारण सर्व उपनिषदांचें दोहन करून हें गीतारूपी दूध भगवंतांनीं अर्जुनाच्या निमित्तानें जगताला दिलें आहे. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्राय: प्रत्येक विचार गीतेंत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष आहे असं अनुभवी पुरुषांनीं यथार्थपणें म्हटलें आहे. गीता हा लहानसाच पण हिंदुधर्माचा मुख्य ग्रंथ आहे.

गीता श्रीकृष्णानें सांगितली हें तर सर्वांना माहीतच आहे. ही थोर शिकवण ऐकणारा भक्त अर्जुन ह्या शिकवणीशीं इतका समरस झाला कीं, त्यालाहि 'कृष्ण' संज्ञा प्राप्त झाली . देवा-भक्तांचें हें हृद्गत प्रगट करीत असतां व्यास-देव इतके विरघळून गेले कीं, त्यांनाहि लोक 'कृष्ण' ह्याच नांवानें ओळखूं लागले. सांगणारा कृष्ण, ऐकणारा कृष्ण, रचणारा कृष्ण असें तिघांत जणूं अद्वैत उत्पन्न झालें. तिघांची जणूं समाधि लागली. गीतेच्या अभ्यासकाला अशीच एकाग्रता पाहिजे.

कित्येकांना वाटतें, गीतेचा आरंभ दुसऱ्या अध्यायापासून धरावा. दुसऱ्या अध्यायाच्या ११ व्या श्लोकापासून प्रत्यक्ष उपदेशाला सुरुवात होते. तेथूनच आरंभ समजायला काय हरकत आहे? एकजण तर मला म्हणाला, "अक्षरांत अकार ही ईश्वरी विभूति भगवंतांनीं सांगितली आहे. 'अशोच्यानन्वशोचस्त्वम्'च्या आरंभीं आयताच अकारहि आहे. तेव्हां तेथूनच आरंभ धरावा." ही कोटी सोडून दिली तरी तो आरंभ अनेक प्रकारें योग्य आहे यांत शंका नाहीं. तरी पण तत्पूर्वीच्या प्रास्ताविक भागाचेंहि महत्त्व आहेच. अर्जुन कोणत्या भूमिकेवर आहे, कोणती गोष्ट सांगण्यासाठीं गीतेची प्रवृत्ति झाली आहे, हें हा प्रास्ताविक कथाभाग नसता तर नीट लक्षांत येतें ना.

अर्जुनाचें क्लैब्य दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठीं गीता सांगितली गेली असें कांहीं लोक म्हणतात. त्यांच्या मतें गीता कर्म-योग सांगणारी आहे एवढेंच नव्हे तर ती युद्ध-योग सांगणारी आहे. जरा विचार केला तर ह्या म्हणण्यांतील चूक दिसून येईल. अठरा अक्षौहिणी सैन्य लढावयाला सिद्ध होतें. अर्जुनाला सबंध गीता ऐकवून त्या सैन्याच्या लायकीचें केलें असें का आपण म्हणणार? अर्जुन घाबरला. तें सैन्य घाबरलें नव्हतें. तें का अर्जुनाहून अधिक योग्यतेचें? ही तर कल्पनाच करवत नाहीं. अर्जुन लढाईंपासून परावृत्त होत होता तो भित्रा म्हणून नव्हे. शेंकडों लढाया खेळलेला तो महावीर होता. उत्तर-गोग्रहणाच्या वेळेस त्यानें एकट्यानें भीष्म-द्रोणकर्णांना हतबल केलें होतें. नेहमीं विजय मिळविणारा, सर्व नरांतील एकच खरा नर अशी

त्याची ख्याति होती. वीर-वृत्ति त्याच्या रोमरोमांत होती. अर्जुनाला डिवचण्यासाठीं क्लैब्याचा आरोप तर कृष्णानेंहि करून पाहिला. पण तो बाण वायां जाऊन पुढें वेगळयाच मुद्यांवर ज्ञान-विज्ञानांचीं अनेक व्याख्यानें द्यावी लागलीं आहेत. तेव्हां क्लैब्य निरसनाइतकें सोपें तात्पर्य गीतेचें नाहीं हें निश्चित आहे.

दुसरे कांहीं म्हणतात, अर्जुनाची अहिंसा-वृत्ति दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठीं गीता सांगितली आहे. माझ्या दृष्टीनें हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. तें कसें हें पाहण्यासाठीं आपणाला अर्जुनाची भूमिका तपासली पाहिजे. त्या कामी पहिला अध्याय आणि त्याचें दुसऱ्या अध्यायांत शिरलेलें आख्यान फार उपयोगी आहे.

अर्जुन रणांगणावर उभा राहिला तो कृतनिश्चयानें आणि कर्तव्यभावनेनें उभा राहिला होता. क्षात्र-वृत्ति त्याच्या स्वभावांत होती. युद्ध टाळण्याचा शिकस्त प्रयत्न करून तें टळलें नव्हतें. कमींत कमी मागणी व कृष्णासारख्याची मध्यस्थी दोन्ही वायां गेल्या होत्या. अशा स्थितींत देशोदेशींचे राजे जमवून आणि कृष्णाला सारथ्य पत्करायला लावून तो रणांगणावर उभा राहतो आणि वीर-वृत्तीच्या उत्साहानें कृष्णाला म्हणतो-"दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं माझा रथ नेऊन उभा कर म्हणजे कोण माझ्याबरोबर लढण्यासाठीं जमले आहेत त्यांचीं तोंडें एकदां मी पाहून घेतों." कृष्ण त्याच्या म्हणण्याप्रमाणें करतो आणि अर्जुन सभोंवार नजर फिरवितो. तों त्याला काय दिसतें ! दोन्ही बाजूंना आपल्याच नातेवाईकांचा, सग्यासोयऱ्यांचा प्रचंड मेळावा उभा आहे, 'आजे, बाप, मुलें, नातू'-आप्तसंबंधाच्या चार पिढ्या मारण-मरणाच्या अंतिम निश्चयानें एकत्र झाल्या आहेत असें त्याला दिसतें. ह्या गोष्टीची कल्पना आधीं त्याला नसेल असें नाहीं. पण प्रत्यक्ष दर्शनाचा एक वेगळाच परिणाम असतो. तो सारा स्वजनसमूह पाहून त्याच्या हृदयाची कालवाकालव सुरू होते. त्याला फार वाईट वाटतें. आजपर्यंत त्यानें अनेक लढ्यांत असंख्य वीरांचा संहार केला होता. त्यावेळीं त्याला वाईट वाटलें नाहीं, त्याचें गांडीव गळून पडलें नाहीं, त्याच्या शरीराला कांपरें भरलें नाहीं, त्याचे डोळे ओले झाले नाहींत. मग आतांच हें असें कां ! त्याच्या ठिकाणीं का अशोकाप्रमाणें अहिंसावृत्तीचा उदय झाला होता ! नाहीं, ही सारी स्वजनासक्ति होती. आजच्या घटकेलाहि जर समोर गुरु, बंधु, आप्त, नसते तर त्यानें शत्रूंचीं मुंडकी चेंडूप्रमाणें उडविली असतीं. पण आसक्तिजन्य मोहानें त्याची कर्तव्यनिष्ठा ग्रासली. आणि मग त्याला तत्त्वज्ञान आठवलें. कर्तव्यनिष्ठ मनुष्य मोहग्रस्त झाला तरी नागडी कर्तव्य च्युति त्याला सहन होत नाहीं. तो तिला एखादा सद्विचार नेसवितो.

अर्जुनाचें असेंच झालें. तो आतां युद्धच मुळांत पाप आहे असें उसनें प्रतिपादन करूं लागला. युद्धानें कुलक्षय होईल, धर्म लोपेल, स्वैराचार माजेल, व्यभिचारवाद पसरेल, दुर्भिक्ष ओढवेल, समाजावर संकटें येतील, असे अनेक मुद्दे तो कृष्णालाच समजावून सांगूं लागला.

मला ह्या ठिकाणीं एका न्यायाधीशाची गोष्ट आठवते. एक न्यायाधीश होता. शेंकडों अपराध्यांना त्यानें फांशीची शिक्षा दिली होती. परंतु एके दिवशीं त्याचा स्वतःचा मुलगा खुनी म्हणून त्याच्यासमोर उभा करण्यांत आला. त्याच्यावरचा खुनाचा आरोप सिद्ध होऊन त्याला फांशीची शिक्षा देण्याची न्यायाधीशाला पाळी आली. पण तसें करतांना तो न्यायाधीश कचरला. तो बुद्धिवाद बोलूं लागला. "फांशीची शिक्षा अमानुष आहे, ती देणें मनुष्याला शोभत नाहीं. मनुष्याला सुधारण्याची आशा त्यामुळें नष्ट होते. खून करणारानें भावनेच्या भरांत खून केला. परन्तु त्याच्या डोळ्यावरचा खून उतरल्यावर त्या माणसाला गंभीरपणें उचलून फांसावर लटकवून मारावयाचें हें समाजाच्या माणुसकीला लाजिरवाणें व काळिमा फांसणारें आहे." वगैरे मुद्दे तो न्यायाधीश मांडूं लागला. तो मुलगा समोर न येता तर मरेपर्यंत न्यायाधीशसाहेब खुशाल फांशीची शिक्षा देत राहते. मुलाबद्दलच्या ममत्वामुळें न्यायाधीश असें बोलूं लागला. तें बोलणें आंतरिक नव्हतें. तें आसक्तिजन्य होतें. 'हा माझा मुलगा' ह्या ममत्वांतून निर्माण झालेलें तें वाङ्मय होतें.

अर्जुनाची ह्या न्यायाधीशासारखी गत झाली. त्यानें मांडलेले मुद्दे चुकीचे नव्हते; गेल्या महायुद्धाचे नेमके हेच परिणाम जगानें पाहिले. पण विचाराची गोष्ट इतकीच कीं, अर्जुनाचें तें तत्त्वज्ञान नव्हतें. तो त्याचा प्रज्ञावाद होता. कृष्ण हें जाणून होता. म्हणून त्या मुद्यांची मुळींच दखल न घेतां त्यानें सरळ मोहनाशाचा उपाय अवलंबिला. अर्जुन जर खरोखर अहिंसावादी झालेला असता तर अवांतर ज्ञान-विज्ञानें कोणी कितीहि सांगितलीं तरी मूळ मुद्यांचें उत्तर मिळाल्याशिवाय त्याचें समाधान झालें नसतें. पण संबंध गीतेंत ह्या मुद्यांचें उत्तर नाहीं आणि अर्जुनाचें समाधान झालेलें आहे. ह्या सर्वांचा भावार्थ इतकाच कीं, अर्जुनाची अहिंसा–वृत्ति नव्हती, तो युद्ध–प्रवृत्तच होता. युद्ध त्याच्या दृष्टीनें त्याचें स्वभाव-प्राप्त आणि अपरिहार्य ठरलेलें कर्तव्य होतें. तें कर्तव्य आतां तो मोहानें टाळूं पाहात होता, आणि गीतेची ह्या मोहावरच मुख्य गदा आहे.

अर्जुन अहिंसेचीच काय पण संन्यासाचीहि भाषा बोलूं लागला होता. ह्या रक्तलांछित क्षात्रधर्मापेक्षां संन्यास बरा असें अर्जुन म्हणतो. पण अर्जुनाचा तो स्वधर्म

होता का? ती त्याची वृत्ति होती का? अर्जुनाला संन्याशाचा वेष सहज घेतां आला असता; पण संन्याशी वृत्ति कशी घेतां आली असती? संन्याशाच्या नांवानें जर तो रानांत जाऊन राहता तर वेथें तो हरणें मारूं लागला असता. भगवान् स्पष्टच म्हणाले, "अर्जुना, अरे लढाई करणार नाहीं म्हणतोस तो तुझा भ्रम आहे. तुझा आजपर्यंतचा बनलेला स्वभाव तुला लढायला लावल्याशिवाय राहणार नाहीं."

अर्जुनाला स्वधर्म विगुण वाटूं लागतो; पण स्वधर्म कितीहि विगुण असला तरी त्यांत राहूनच माणसानें आपला विकास करून घेतला पाहिजे. कारण त्यांत राहूनच विकास होऊं शकतो, ह्यांत अभिमानाचा प्रश्न नाहीं. हें विकासाचें सूत्र आहे. स्वधर्म मोठा म्हणून घ्यायचा नसतो आणि लहान म्हणून टाकायचा नसतो. वस्तुतः तो मोठाहि नसतो, आणि लहानहि नसतो. तो माझ्या बेताचा असतो. 'श्रेयान् स्वधर्मो विगुणः' ह्या गीता वचनांतील धर्म शब्दाचा अर्थ हिंदु धर्म, मुसलमानी धर्म, ख्रिस्ती धर्म अशासारखा नाहीं. प्रत्येक व्यक्तीचा धर्म निरनिराळा आहे. येथें माझ्यासमोर असलेल्या दोनशें लोकांचे दोनशें धर्म आहेत. माझाहि धर्म दहा वर्षांपूर्वी होता तो आज नाहीं. आजचा दहा वर्षांनंतर टिकणार नाहीं. चिंतनानें आणि अनुभवानें वृत्ति पालटत जावे तसतसा पूर्वीचा धर्म गळत जातो आणि नवीन लाभत असतो. हट्टानें कांहींच करावयाचें नसतें.

दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ वाटला तरी तो स्वीकारण्यांत माझें कल्याण नसतें. सूर्याचा प्रकाश मला प्रिय आहे. त्या प्रकाशानें माझी वाढ होते. सूर्य मला वंद्यहि आहे, पण म्हणून मी पृथ्वीवरचें वास्तव्य सोडून त्याच्याजवळ जाऊं पाहीन तर जळून जाईन. उलट पृथ्वीवर राहणें विगुण असेल, पृथ्वी सूर्यापुढें अगदींच तुच्छ असेल, ती स्वयंप्रकाश नसेल, तथापि जोंपर्यंत सूर्याचें तेज सहन करण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें नाहीं तोंपर्यंत सूर्यापासून दूर पृथ्वीवर राहूनच मी माझा विकास करून घेतला पाहिजे. माशाला जर कोणी म्हणेल, "पाण्यापेक्षां दूध मौल्यवान आहे, दुधांत रहा" तर मासा तें कबूल करील का? मासा पाण्यांतच वांचेल, दुधांत मरेल.

दुसऱ्याचा धर्म सोपा वाटला म्हणूनहि स्वीकारावयाचा नसतो. पुष्कळ वेळां सोपेपणाचा भासच असतो. संसारांत बायकामुलांचें नीट रक्षण करतां येत नाहीं म्हणून कंटाळून जर कोणी गृहस्थ संन्यास घेईल तर तें ढोंग होईल व जडहि जाईल. संधि सांपडतांच त्याच्या वासना जोर करतील. संसाराचें ओझें झेपत नाहीं म्हणून वनांत जाणारा आधीं तेथें लहानशी झोपडी बांधील. मग तिच्या रक्षणासाठीं तो कुंपण करील. असें करतां करतां त्याला तेथें सवाई संसार उभा करण्याची पाळी येईल.


वैराग्यवृत्ति असेल तर संन्यासांतहि कठीण काय आहे ? संन्यास सोपा म्हणून सांगणारी ही स्मृतिवचनें तर आहेतच, पण मुख्य मुद्दा वृत्तीचा आहे. ज्याची जी खरी वृत्ति असेल तद्नुसार त्याचा धर्म राहील. श्रेष्ठ–कनिष्ठ, सोपें–कठीण, हा प्रश्न नाहीं. खरा विकास हवा. खरी परिणति हवी.

पण कोणी भाविक विचारतात, "संन्यास जर युद्ध करण्याच्या धर्माहून केव्हांहि श्रेष्ठच आहे तर भगवंतांनीं अर्जुनाला खरा संन्यासी कां बनविलें नाहीं ? त्यांना काय तें अशक्य होतें ?" त्यांना कांहींच नव्हतें. पण त्यांत अर्जुनाचा पुरुषार्थ तो काय राहिला असता ? परमेश्वर मोकळीक देणारा आहे. ज्यानें त्यानें धडपड करावी. त्यांतच गोडी आहे. लहान मुलाला स्वतः चित्र काढण्यांत आनंद असतो. त्याचा हात धरलेला त्याला आवडत नाहीं. शिक्षक जर मुलांना भराभर गणित सोडवून देऊं लागला तर मुलांची बुद्धि कशी वाढणार ? आईबापांनीं, गुरूंनीं सूचना द्याव्या. परमेश्वर आंतून सूचना देत असतो. ह्याहून अधिक तो कांहीं करीत नाहीं. देवानें कुंभाराप्रमाणें ठोकून, पिटून किंवा थापून प्रत्येकाचें मडकें तयार करण्यांत काय स्वारस्य ? आपण मडकीं नाहीं. आपण चिन्मय आहों.

ह्या सर्व विवेचनावरून एक गोष्ट लक्षांत आली असेल कीं, गीतेचा जन्म स्वधर्माच्या आड येणारा जो मोह त्याच्या निवारणार्थ आहे. अर्जुन धर्म–संमूढ झाला होता. स्वधर्माच्या बाबतींत त्याला मोह पडला होता. ही गोष्ट कृष्णानें दिलेल्या पहिल्या ठपक्यानंतर अर्जुन स्वतःच कबूल करीत आहे. तो मोह, तें ममत्व, ती आसक्ति, दूर करणें हें गीतेचें मुख्य काम. सारी गीता सांगितल्यावर भगवंतांनीं प्रश्न केला. "अर्जुना, गेला मोह ?" अर्जुन म्हणाला, "देवा, मोह मेला. स्वधर्माचें भान झालें." अशा प्रकारें गीतेचा उपक्रम आणि उपसंहार जुळवून पाहिल्यास मोहनिराकरण हेंच फलित निघतें. गीतेचेंच नव्हे, तर महाभारताचेंहि हेंच उद्दिष्ट आहे. व्यासांनीं महाभारताच्या आरंभीच म्हटलें आहे कीं, लोकांच्या हृदयांतील मोहावरण घालविण्यासाठीं मी हा इतिहास-प्रदीप पेटवीत आहे.

गीता समजून घेण्यास अर्जुनाची ही भूमिका आपल्या उपयोगी पडली म्हणून आपण तिचे आभार मानूं; त्याशिवाय आणखीहि तिचा उपकार आहे. अर्जुनाच्या ह्या भूमिकेंत त्याच्या मनाची अत्यंत ऋजुता दिसून येत आहे. अर्जुन शब्दाचा अर्थच ऋजु किंवा सरळ स्वभावाचा असा आहे. त्याच्या मनांत जे कांहीं विकार आणि विचार आले ते सर्व त्यानें मोकळ्या मनानें कृष्णापुढें मांडले. त्यानें चित्तांत कांहीं

शिल्लक ठेवलें नाहीं आणि शेवटीं तो कृष्णाला शरण गेला. वस्तुतः तो आधींचाच कृष्ण शरण होता. कृष्णाला सारथि बनवून ज्या वेळेस त्यानें आपल्या घोड्यांचे लगाम त्याच्या हातांत दिले, त्याच वेळीं त्यानें आपल्या मनोवृत्तीचेहि लगाम त्याच्या हातांत सोंपविण्याची तयारी केली होती. आपणहि असेंच करूं या. अर्जुनाजवळ कृष्ण होता. आपल्याला कृष्ण कोठून लाभणार ? असें आपण म्हणूं नये. म्हणून कोणी एक व्यक्ति आहे अशा ऐतिहासिक ऊर्फ भ्रामक समजुतींत आपण सांपडूं नये. अंतर्यामिरूपानें कृष्ण प्रत्येकाच्या हृदयांत विराजमान आहे. जवळांत जवळ तोच आहे. आपल्या हृदयांतील सर्व खळमळ आपण त्याच्यापुढें मांडूं आणि म्हणूं, "देवा, मी तुला शरण आहे. तूं माझा अनन्य गुरु आहेस. मला काय तो मार्ग दाखीव. तूं दाखविशील त्याच मार्गानें मी जाईन." आपण असें करूं तर तो पार्थ-सारथि आपलेंहि सारथ्य करील, आपल्या श्रीमुखानें तो आपल्याला गीता ऐकवील आणि विजय-लाभ करून देईल.




**लहान मुलांच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# साईभक्त आजीबाई बनारसे

लेखिका : सौ. ज्योत्स्ना भोळे

लंडनमध्यें सध्यां अत्यंत यशस्वी व लोकोपयोगी जीवन घालविणाऱ्या श्रीमती आजीबाई बनारसे यांच्या जीवनांत श्रीसाईबाबांनीं आश्चर्यकारक क्रांति कशी घडवून आणली त्यासंबंधीं माहितीपर व उद्बोधक लेख तिकडे जाऊन आलेल्या सौ. ज्योत्स्ना भोळे यांनीं 'केसरी' पत्रांत (ता. २४ ऑक्टोबर १९६५) लिहिला असून त्यांतील कांही भाग आभारपूर्वक पुढें देण्यांत येत आहे—

सौ. ज्योत्स्नाबाई ह्या लंडनला गेल्या असतां आजीबाई बनारसे यांची ख्याती ऐकून त्या त्यांना भेटण्यासाठीं त्यांच्या निवासस्थानीं गेल्या होत्या. आगतस्वागत झाल्यानंतर आजीबाईंनीं त्यांना आपण लंडनमध्यें एकाकी व संकटांत असतां श्रीसाईबाबांनीं आपणांस कसें संकटमुक्त केलें याची हकिगत सांगतांना म्हणाल्या—

**एक नवलकथा**

"अठरा वर्षं झालीं मला इथे येऊन बाई. या मुलीचे वडील गेल्यावर, माझं दुसरं लगीन झालं व त्यांच्याबरोबर मी लंडनला आलें. पण माझ्या नशिबांत तें सौभाग्यलेणं नव्हतं. तीन वर्षांनीं माझं कुंकू घेऊन तेहि देवाघरीं निघून गेले! झालं आभाळच कोसळल्यावाणी झालं!! त्या कुडबुड्याने सांगितल्याप्रमाणें साता समुद्रापलीकडे आलें होतें खरी. माझ्या डोळ्यांतल्या पाण्यानें आणखी एक आठवा समुंदर तयार झाला असता. असा प्रसंग, अशी वेळ वैऱ्यावर सुद्धां येऊं नये बाई!" आजीबाई अत्यंत जिव्हाळ्यानें आपली हकीगत सांगत होत्या, आणि मीहि ती लक्षपूर्वक ऐकत होतें. खरोखरीच एकेक प्रसंग ऐकून वाईट वाटत होतं."

"बाई, सावत्र मुलगेहि आहेत मला, पण आपलं माणूस सोडून गेलं की संपलं बघा. जगांत मग कोणी कोणाचं नाहीं."

मी म्हटलं, "खरं आहे आजीबाई" मध्यें चहा आल्यामुळें बोलण्यांत थोडा खंड पडला. नंतर मीच पुन्हां सुरुवात केली.

"खरंच आजीबाई, तुमचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. कांटेरी मार्गांत तुम्ही आज फुलं फुलवलींत."

"अहो, बाई, माझं कसलं कौतुक! माझ्या साईबाबांची करणी आहे ही सगळी. त्यांनींच मला धीर दिला. प्रत्यक्ष येऊन त्यांनींच मला मार्ग दाखविला. ज्या वेळीं माझ्या हातांत एक 'पेनी'सुद्धां नव्हती, त्याच वेळीं माझ्या हाताला धरून बाबा मला एके अज्ञात ठिकाणीं घेऊन गेले. अशीच उंबरठ्यावर मी रडत बसले असताना एका व्यक्तीनं मला विचारलं, 'घर विकायचं आहे, घ्यायचंय का?' लंडनला घर घेणं म्हणजे काय थट्टा आहे? मी म्हटलं 'विष खायला देखील माझ्याजवळ पेनी नाहीं, तिथं घर काय घेणार मी? तेव्हां ते म्हणाले, 'कांहीं काळजी करूं नका. सावकाश पैसे द्या, आम्ही मदत देतों तुम्हाला.' ते शब्द ऐकल्यावर मीहि लगेच 'होय' म्हटलं. बाई, आज तुम्ही बसला आहांत तें घर मी अठरा वर्षांपूर्वी अशा परिस्थितींत घेतलं. फार फार कष्ट करावे लागले मला. कित्येक वेळां वाटायचं थेम्स नदींत जीव द्यावा, पण वेळोवेळीं बाबानींच मला धीर दिला, आणि आज त्यांच्याच आशीर्वादानें मी हें दिवस पाहातें आहे.

सध्यां तीन घरें आहेत माझी. पांच लेकी, मला स्वतःचा लेक नाहीं. एक मोठी मुलगी गांवाला आहे व चौघी इथं आहेत. दुसरं घर आहे तेंहि वत्सल बघते. तिथेंहि विद्यार्थीच राहतात. आता चांगलं चाललं आहे.'

## गणपतीपुढें गाणं

जवळजवळ सर्व इतिहास मला आजीबाईंनीं प्रथम भेटींतच सांगितला. गणेशोत्सव असल्यामुळें त्यांच्या ओळखीच्या बऱ्याच बायका दुपारी आजीबाईंना मदत करायला यायच्या. हास्य-विनोदांत फराळ व्हायचा. आरती वगैरे सर्व यथासांग व्हायचं. रात्रीं भजन व श्री. जोशी गीत-रामायण ऐकवावयाचे. आजींच्या आग्रहा-वरून त्याच रात्रीं मीहि एक भजन म्हटलं. ते म्हणे त्यांना इतकं आवडलं कीं, नेहमी त्या मला म्हणायच्या, 'पहिल्या दिवशीं म्हटलेलं भजन अजून आंत जाऊन बसलंय' त्या क्षणीं त्यांनीं मला सांगून टाकलं, 'बाई, गणपतीच्या पुढें गाणं झालं पाहिजे हं! आमचा गणपती मोठा भाग्याचा. बाई पुण्याहून आल्या गाण्याला!' या आमच्या आजीबाई बनारसे.

आजीबाई अठरा वर्षें लंडनला आहेत, पण त्यांच्यांत कांहींहि बदल झालेला नाहीं. इंग्लिश लोक येवोत वा अमेरिकन येवोत, आजीसाठीं त्यांनी वाटलं तर स्वतःत बदल करावा, पण आमच्या आजी आपल्या आहेत तशाच आहेत. नाइलाज म्हणून अन् तिथल्या हवेंत मस्ती चालत नाहीं म्हणून टॉपकोट, बूट व डोक्याला रुमाल हा सरंजाम नऊवारी लुगड्यावर चढवलेला. कुठेहि लंडनमध्यें दिसल्या कीं, खुशाल समजावं त्या आजीबाई बनारसे आहेत म्हणून अन् नमस्कार ठोकावा.

## इंग्रजीचं अक्षर नाहीं

अशा या आजीबाईंना इंग्लिश बोलतां येत नाहीं. तरीहि पेनीपासून ते हजारो पौंडांचा व्यवहार पाहतात हें कुणाला खरं तरी वाटेल का ? एकदा शेजारी राहणारी एक इंग्लिश बाई, 'काय दिवस–रात्र गडबड करतां तुम्ही' म्हणून त्यांच्याशीं भांडायला आली, तर आजीबाईंनीं तिला 'स्वतःची' इंग्लिश भाषा बोलून आली तशी परतवून लावली. त्यांनीं एका वाक्यांत तिला सांगितलं, 'टुडे रिलीजस फंक्शन ! नॉट टुमारो !' हें वाक्य दर दोन मिनिटांनीं तिच्या कानांवर आदळल्यावर ती आली तशी तडफडत चालती झाली ! नंतर रोजच माझा मुक्काम त्यांच्या घरीं असायचा. खरं म्हणजे मी उतरले होते श्री. अंगाडी यांच्याकडे; पण ते स्वतः दिवसभर कामांत असायचे. सौ. अंगाडीहि एका शाळेंत नोकरी करीत. घरांत कोणीच नसे. त्यामुळें साहजिकच मी दिवसभर आजीबाईंकडे असायची. श्री. अंगाडी यांनीं पैगणकरांना सांगून आपण-हून मला आपल्या घरीं उतरवून घेतली होती. पण आजीच्याकडे रोज रतीब लावल्या-सारखी मी जायची ! जायची म्हणण्यापेक्षां कला न चुकतां, मला गाडींतून सकाळीं अकरा वाजतां घेऊन जायची ते रात्रीं बारापर्यंत ! खरोखर इतका चुटकीसरशी वेळ जात असे. मलाहि खूपच बरं वाटायचं त्यांच्याकडे. कुठं गणपतीसाठीं हार तयार कर, कुठं आरास, कुठं फराळाचं कांहीं ना कांहीं मीहि घरच्यासारखं काम करीत असे. आजीबाईंकडे माझ्या बऱ्याच ओळखी झाल्या. त्यांतूनच आमचं भजनी मंडळ निघालं. दर गुरुवारीं व शनिवारीं लंडनसारख्या शहरीं आम्हीं धडाक्यांत, इंग्रज लोकांच्या नाकावर टिच्चून भजन करीत असूं. परंतु तरी देखील इंग्रज

---


### "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टॅंप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं कधीं तक्रार केली नाहीं, ती कदाचित् आमच्या भजनांतील नैसर्गिक ' हार्मनी 'मुळेंच असेल !

## अडचणीला आधार

सर्वांत मोठा गुण म्हणजे आजीबाईंच्या दारावर अपरात्रीं देखील कुणीहि थाप मारावी. दरवाजा उघडला नाहीं व त्या व्यक्तीला आश्रय मिळाला नाहीं असं कधींहि घडलं नाहीं. फक्त बाथरूममध्येंच तेव्हढा बिछाना घातला नसेल, कारण तिथें झोपणंच शक्य नाहीं म्हणून. बाकी ' डायनिंग रूम 'मध्यें देखील वेळ पडल्यास मंडळी झोपली आहेत ! ही मंडळी म्हणजे पैसे मोजून उतरायला आलेली नव्हेत बरं का ! केवळ ओळखीची ! ' आतां आम्ही कुठं जाणार, आजीबाई, इथंच झोपतों झालं,' याला आजीबाई तरी काय उत्तर देणार ? कुणालाहि दुखवणं त्यांना जमत नाहीं. अगदीं चमचमीत जेवण, लोणचीं पापडांसह अन तेंहि लंडनसारख्या ठिकाणीं. आग्रह करून वाढल्यावर लोक त्यांना सोडून कशाला जातील ?

गणपतींत दहा दिवस आजीबाईंना चिकार काम पडतं. पण कोणीहि अवेळीं येऊं दे, ' अहो, जेवून जावा ना,' हें आजीबाईंचं लाडकं वाक्य कानावर पडल्याशिवाय राहत नाहीं. नंतर अनंत चतुर्दशीला दरवर्षीं पांचशें ते सहाशें मंडळीचं पान उठतं. अशींच एक दिवस, आजीबाई सकाळपासून कामांत चूर होत्या. मी तिथंच असल्यामुळें, त्यांनीं कांहीं खाल्लं नाहीं हें मला ठाऊक होतं. तेव्हां दुपार झाल्यावर मी त्यांना म्हटलं, आजी, तुम्ही सकाळपासून कांहीं खाल्लं नाही. आतां आधी तुम्ही जेवा आणि मग काम करा. उपाशीपोटीं काम करून डोकं दुखेल' त्या एकदम गहिंवरून म्हणाल्या, " बाई, मी सकाळपासून काहीं खाल्लं नाहीं, हें तुमच्या ध्यानांत आलं. या सर्व माझ्या मुली सकाळपासून माझ्याबरोबर कामं करतात. पण एकीनेंहि मला खाऊन घे, म्हटलं नाहीं. फक्त माझ्या बाईंनी मला ' आधी तुम्ही जेवा,' म्हणून पुन्या भाजी पुढ्यांत ठेवली. तेव्हांपासून आजी मला आपली मुलगी म्हणायच्या आणि मीहि त्यांना आजी न म्हणतां ' आई ' म्हणायची.

## श्रद्धा आणि निष्ठा

त्यांच्या घरीं त्या तेहतीस कोटि देव वास करीत असलेल्या हॉलमध्यें जाऊन बसले की खूप बरं वाटत असे. कां कोण जाणे, पण पहिल्यपासून मला साध्यासुद्धां माणसांत वावरायला फार आवडतं. उगाच वरचा दिखाऊपणा जिथे असतो तिथे माझं मन रमत नाहीं एवढं खरं.

जावं आतां ' आई ' कडे म्हणून जर सकाळीं मी बाहेर पडलें, तर मग चहा, पाणी जेवण आटपूनच राहत्या मुक्कामीं परत जावं लागे. त्यांतून बुधवार हा खास ' फिश ' च्या जेवणाचा वार माझ्यासाठीं ठेवला होता. त्या दिवशीं मी कुठेहि जातां

कामा नये. संध्याकाळीं जेवण आईकडे, जरा कुठे आपलं लक्ष बाजूला झालं कीं ताटांत दोन तुकडे आणखी पडलेच म्हणुन समजावं. असा हा आजीबाईंचा स्वभाव. पहिल्याच भेटींत त्यांनी मला सांगितलं होतं, 'बाई, तुम्हीं परदेशांत आहांत कांहीं अडचण असेल तेव्हां जरूर सांगा हं, संकोच करूं नका.' कोण कोणासाठीं करते आजकालच्या जगांत! आजीबाई या लंडनला सर्वांचा आधार आहेत. कांहीं लागलं कीं मारा हाक आजीबाईला. आतां खरं म्हणजे त्या सर्व व्यापाला कंटाळल्या आहेत. एकोणतीस जुलैला त्यांनीं श्रीसाई पादुका स्थापन करून लंडनला मोठा समारंभ केला. इथून कीर्तनकार नेले होते. ज्यांना अज्ञात बाबांनी हाताला धरून 'हें घर खरेदीं कर' म्हणून ओढून नेलं होतं व पुन्हा कधींहि भेटले नव्हते, त्या आजीनी बाबांना श्रद्धायुक्त कर्तबगारीनें आपल्या हॉलमध्यें स्थानापन्न करून ठेवले. कारण त्यांची धारणा आहे कीं, 'ज्या अज्ञात व्यक्तीने मला हें घर खरेदी करण्यास सांगितलें, ती व्यक्ति म्हणजे माझ्या हांकेला धांवून आलेले बाबाच होत!' याला आपण काय म्हणूं? श्रद्धा आणि निष्ठा. या सर्वांच्या आजीबाई. पण मला मात्र लंडन मुक्कामी भेटलेली प्रेमळ आई!



## मुंबई कचेरींतील पुण्यतिथ्योत्सव

प्रतिवर्षाप्रमाणें विजयादशमी दिवशीं बाबांच्या पुण्यस्मरणार्थ मुंबई (दादर) येथील श्रीसाईनिकेतनमध्यें भक्तिभावपूर्ण असे पुढील कार्यक्रम झाले:— श्रीमती नाचणें यांचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन, श्री. मा. बा. नाचणें यांचेंही प्रवचन झालें. त्याच-प्रमाणें हनुमान प्रासादिक भजन मंडळीचें भजन. त्या दिवशीं सायंकाळीं ३ ते ५ वाजेपर्यंत हे कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडले.



**Mr. V. P. Naik** Chief Minister of Maharashtra, receiving a cheque for Rs. 5000 from **Mr. B. G. Potnis**, Court Receiver of Shri Saibaba Sansthan, Shirdi, and another cheque for Rs. 426–30 from the staff of Sansthan towards National Defence Fund at Sachivalaya on Wednesday. 21-10-1965.




( सप्टेंबर १९६५ )

चालू महिन्यांत श्रीसाई दर्शनास भक्तांची गर्दी बरीच कमी होती. याचें कारण भारतावर युद्धसंकट व महागाई व पावसाळा अशामुळें गर्दी कमी होती. कांहीं कलाकारांनीं श्रींपुढें हजेरी दिली, तीं खालील प्रमाणें:—

**कीर्तन**

संस्थानतर्फे श्री. मराठे यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झाली.

**गायन**

श्री. लिला कुलकर्णी मुंबई. श्री. बी. सायण्णापार्टी पुणें. श्री. सौ. ज्योत्स्ना भोळे पुणे. श्री. पेदास्वामी ( उटी ) मद्रास श्री. दामोदर मधुसुद्दन वैद्य, सौ. साधना वैद्य, कु. विमल दिवाकर. कुमार श्रीपाद वैद्य, औरंगाबाद. ( मराठवाडा ) श्री. लिलाधर भानू पाटकर दादर मुंबई.

**नृत्य**

कल्पना डान्सींगपार्टी पुणें, मंगल डान्सींगपार्टी पुणें.

**नवल विशेष**

श्री गजानन उत्सव ( श्रीसाईसंस्थान पगारदार नोकरांची सोसायटी ) दिक्षीत वाडा हॉल साईसंस्थान नोकर भजन मंडळातर्फें भजन झाले. स्वतः मे. माननीय रिसीव्हर साहेब यांनीं भक्तीपूर्वक तालसुरांत भजने म्हटलीं, व वेळोवेळी भजन मंडळास प्रोत्साहन देऊन सुधारणा केली.

**मोठ्यांच्या भेटी**

सौ. स्नेहलता पोतनीस बाईसाहेब डेप्युटी लिगल सेक्रेटरी सचिवालय महाराष्ट्र राज्य मुंबई.

**जाहीर सभा**

मे. डॉ. पिंटो साहेब यांचे अध्यक्षतेखाली संस्थान नोकरांची सभा भरून एक दिवसांचा पगार सर्व नोकरांनीं संरक्षण निधीस देण्याचा ठराव सर्वांनुमतें पास केला.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई नाहीं.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगारकरकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.



मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: वी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.